
१०३ शतकोत्तर वाटचाल
R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
• मुंबई, रविवार १५ जून, २०२५ • वर्ष-१०३, अंक-१०१, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL
• Vol.- 103, Issue - 101, Marathi - Daily - Mumbai, 15 June, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## शुभांशू शुक्ला १९ जून रोजी अंतराळात झेपावणार

**नवी दिल्ली -** भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांची ॲक्सिओम-४ (ॲक्स-०४) या मोहिमेद्वारे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात उड्डाण करण्याची तारीख आता निश्चित झाली आहे. त्यानुसार ते १९ जून रोजी फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरमधून स्पेसएक्सच्या फाल्कन ९ या रॉकेटमधून उड्डाण करणार आहेत. यापूर्वी शुभांशू यांचे अंतराळ उड्डाण पाच वेळा लांबणीवर पडले होते. आधी हवामानातील बदलामुळे नंतर यानातील ऑक्सिजनच्या गळतीमुळे हे उड्डाण पुढे ढकलण्यात आले होते. मात्र आता यानाची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर उड्डाणाची नवी तारीख जाहीर करण्यात आली आहे.



## डीजीसीएने एअर इंडियाला आधीच इशारा दिला होता

**एअर इंडियाच्या अहमदाबाद-लंडन विमानाच्या अपघाताचा उच्चस्तरीय तपास सुरू असताना एक धक्कादायक माहिती उघड झाली आहे. नागरी उड्डाण मंत्रालयाचे माजी सहसचिव सनाथ कौल यांनी म्हटले की, नागरी उड्डाण नियंत्रक म्हणजेच डायरेक्टरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशन (डीजीसीए) यांनी एअर इंडियाला वारंवार पत्र पाठवून एअर इंडियाकडून विमानांची योग्य प्रकारे सुरक्षा तपासणी होत नसल्याचे म्हटले होते. विमानाच्या देरवभालीच्या प्रक्रियेतही गंभीर त्रुटी आढळून आल्या. या त्रुटींबाबत डीजीसीएने याआधीच एअर इंडियाला इशारा दिला होता. एअर इंडियाच्या सुरक्षा प्रणालीवर प्रश्न उपस्थित केला होता .**

■ नवी दिल्ली



**विमान** अपघात तपासणी विभाग, बोईंग आणि ब्रिटिश तज्ज्ञ अपघाताच्या ठिकाणी तपास करून शक्यता व्यक्त करत असताना कौल यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. गंभीर चुकांमुळे हा अपघात झाला असावा, असे मत या सर्वांनी व्यक्त केले आहे.

कौल यांनी म्हटले की, सुरक्षा तपासणीसाठी जबाबदार असलेल्या एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांकडून राहिलेल्या त्रुटी किंवा योग्य प्रकारे न केलेल्या नियामक तपासण्या व ऑडिट दुर्घटनेला कारणीभूत ठरले असावे. डीजीसीएने एअर इंडियाला याबाबत अनेकदा पत्र पाठवली होती. त्यामध्ये अनेक मुद्यांचा समावेश होता. विशेषतः सुरक्षेबाबतच्या तपासण्या अयोग्य » पान २ वर

# सत्तेत जाऊ! निधी घेऊ! कामे होतील
# शरद पवारांच्या आमदारांची पुन्हा मागणी

**राष्ट्रवादीचे दोन गट एकत्र येतील अशी चर्चा वेग घेत असताना दोन्ही गटांनी त्यांच्या वर्धापनदिनी या शक्यतेचा उच्चारही न केल्याने ही चर्चा एकदम थांबली. त्यानंतर आता शरद पवार गटाने पुन्हा निधीचा विषय पुढे करीत अजित पवार यांच्याबरोबर जाऊन सत्तेत सामील होऊ ही मागणी पुन्हा एकदा सुरू केली आहे.**

■ मुंबई

**विरोधी** बाकांवर बसून मतदारसंघातील कामांना निधी मिळत नसल्याने कामे होत नाहीत अशी तक्रार करीत शरद पवार गटातील आमदार अस्वस्थ झाले आहेत. त्यासाठी त्यांनी पक्षप्रमुख शरद पवार यांच्याकडे सत्तेत सहभागी होण्याची मागणी केली आहे. सत्तेत गेल्यासच निधी मिळेल, कामे होतील अशी भूमिका आमदारांकडून मांडली जात आहे. मात्र युती केली तर सत्तेत भाजपासह जावे लागणार आहे आणि शरद पवार यांनी भाजपासोबत युती करण्यास स्पष्ट नकार दिला आहे.



शरद पवार यांच्या मताचा सन्मान केला जाईल की नाराज आमदार शरद पवार गटातून फुटतील हे पाहावे लागेल. आमदारांना सत्तेचे वेध लागले असले तरी पक्षातील कार्यकर्ते आणि सर्व खासदार शरद पवार यांच्या पाठीशी असल्याचे शरद पवार गटाकडून सांगण्यात येत आहे. हा फुटीरांना एक प्रकारे इशाराच आहे.

शरद पवार आणि अजित पवार हे दोघे नेते त्यांच्या व्यवसायाशी संबंधित कार्यक्रमावेळी एकत्र येतात. गेल्या महिन्यात असे कार्यक्रम व बैठका अनेक झाल्या. यामुळे दोघे सातत्याने एकत्र दिसू लागले. साखर कारखाने, सहकारी बँका, शाळा, रयत शिक्षण अशा अनेक संस्थांमध्ये दोघेही कार्यरत आहेत. मात्र त्यांच्या या सततच्या जाहीर भेटीमुळे ते एकत्र येण्याची चर्चा सुरू झाली. त्याचवेळी पुण्यात वसंतदादा शुगर कारखाना कार्यक्रमावेळी दोघे नेते मंचावर आल्यावर अजित पवार यांनी शरद पवार यांच्या शेजारी बसण्याचे टाळत मध्ये एक खुर्ची सोडली.

यानंतर युतीची चर्चा थबकली. त्यातच शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वीच पक्षातील काही लोक अजित पवार गटात जाण्यास इच्छुक आहेत. मात्र निर्णय घेण्याचा अधिकार सुप्रिया सुळे यांच्याकडे आहे, असे सूचक वक्तव्य केले होते. परंतु अजित पवार यांच्याकडून त्यालाही काहीही प्रतिसाद आला नाही. त्यामुळे आता शरद पवार गट पुन्हा फुटतो का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

## उबाठाच्या किशोरी पेडणेकरना मनसेचे निमंत्रण! पुन्हा चर्चा

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसे नेते संतोष धुरी यांनी आज रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराला उबाठाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांना मनसेने निमंत्रण दिले. पेडणेकर यांनीही निमंत्रण स्वीकारत रक्तदान शिबिराला हजेरी लावली. यावेळी त्या ठिकाणी पेडणेकरांवर घणाघाती आरोप करणारे मनसे नेते संदीप देशपांडे देरवील उपस्थित झाले. दोघांनी एकमेकांना हसत अभिवादन केले. त्यामुळे मनसे व उबाठा युतीबाबत आता पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.**

■ मुंबई



**वरळी** येथील जम्बो कोविड केंद्रात कामगार पुरविण्याचे कंत्राट महापौर किशोरी पेडणेकर यांच्या मुलाच्या किश कॉर्पोरेट सर्व्हिसेस इंडिया कंपनीला मिळाले असल्याचा आरोप २०२० मध्ये संदीप देशपांडे यांनी केला होता. २०२१ मध्ये नालेसफाईच्या कामात पेडणेकर, सत्ताधारी आणि ठेकेदार भ्रष्टाचार करत आहेत, असा आरोप देशपांडे यांनी केला होता. त्यावर आरोप करणारे कोण आहे याची आधी दखल घ्यावी, नंतरच त्या व्यक्तीला प्रसिद्धी द्यावी. कारण मनसेला आरोप करण्याशिवाय दुसरे काम नाही, असा टोला किशोरी पेडणेकर यांनी लगावला होता. २०२२ मध्ये वरळीतील यादव नगर चिमदास विठ्ठलदास पत्राचाळ शंकर नगर नरमपथ मार्ग येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात पेडणेकर यांनी आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप संदीप देशपांडे यांनी केला. तुम्ही म्हणता की, तुम्ही महिला आहे. मग पैसे खाताना तुम्ही » पान २ वर

## इराण-इस्त्रायलमध्ये तुंबळ युद्ध एकमेकांवर तुफान हवाई हल्ले
### दोन्ही देशांकडून क्षेपणास्त्रांचा मारा

■ तेल अवीव

**इस्त्रायलने** शुक्रवारी इराणच्या आण्विक तळांवर हल्ला केल्यानंतर या दोन देशांमध्ये युद्ध पेटल्यासारखी परिस्थिती उद्भवली आहे. इस्त्रायलच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने शुक्रवारी रात्रीपासून इस्त्रायलवर क्षेपणास्त्रांचा अक्षरशः पाऊस पाडला. या हल्ल्यात इस्त्रायलच्या उत्तर भागाला लक्ष्य करण्यात आले. आज सकाळीही इराणने क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्यानंतर इस्त्रायलने पुन्हा इराणवर हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये आणखी ६० जणांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्यानंतर इराकने आणीबाणीची घोषणा केली आहे. तर इस्त्रायलमध्ये भयाण शांतता पसरली आहे. आज पहाटे इराणने इस्त्रायलच्या तेल अवीव आणि जेरुसलेम या दोन प्रमुख शहरांवर १५० बॅलिस्टिक » पान २ वर

### इराणची हवाई हद्द बंद! भारताने विमाने वळवली

इराण-इस्त्रायलमधील तणावानंतर इस्त्रायलची हवाई हद्द बंद करण्यात आली आहे. त्यामुळे विमान वाहतूक विस्कळीत असून त्याचा फटका भारतालाही बसत आहे. भारतातून लंडन, न्युयॉर्क, कॅनडाला जाणारी विमाने अन्य मार्गाने वळवावी लागत आहेत. पहिल्या दिवशी या प्रकारे १७ विमाने वळवावी लागली. इराण-इस्त्रायल तणावामुळे विमानांना लांबचे अंतर कापावे लागेल. त्यामुळे रवर्चही वाढणार आहे.

## प्रसिद्ध लालबागचा राजा गणेश मुहूर्त पूजन संपन्न



■ मुंबई

**यावर्षी** गणेशोत्सव गणेशचतुर्थी, बुधवार २७ ऑगस्ट ते अनंतचतुर्दशी शनिवार ६ सप्टेंबर या कालावधीत साजरा होणार आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी लालबागच्या राजाचा गणेश मुहूर्त पूजन आज मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब सुदाम कांबळे यांच्या हस्ते सकाळी ठीक ६ वाजता लालबागच्या राजाचे मूर्तिकार कांबळी आर्ट्स यांच्या कार्यशाळेत संपन्न झाले. यावेळी मंडळाचे खजिनदार मंगेश दत्ताराम दळवी यांच्या हस्ते लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या पावती पुस्तकांचेही पूजन झाले.

## द.आफ्रिकेचा ऑस्ट्रेलियावर विजय २७ वर्षांनी चॅम्पियनशिप जिंकली




■ लंडन

**लॉर्ड्स** क्रिकेट मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना आज चौथ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेने ५ गडी राखत जिंकला. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने २७ वर्षांनंतर प्रथमच आयसीसीच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले. गतविजेता ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २८२ धावांचे आव्हान दिले होते. मात्र ते सलामीवीर फलंदाज मर्करामच्या १३८ धावांच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने ८३.४ षटकांत गाठून वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची ट्रॉफी उचलली. ऑस्ट्रेलियाचे सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावण्याचे स्वप्न भंगले.

ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात २१२ धावा केल्या होत्या. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ १३८ धावाच उभारु शकला. त्यामुळे पहिल्या डावाच्या आधारे ऑस्ट्रेलियाला ७४ धावांची आघाडी मिळाली होती. मग ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव तिसऱ्या दिवशी २०७ धावांवर संपुष्टात आला. दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २८२ धावांचे आव्हान मिळाले. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेची सुरुवात धक्कादायक झाली. रियान रिकेल्टन फक्त ६ धावा करू शकला. मिशेल स्टार्कने त्याला बाद केले. वियान मुल्डरनेही फक्त २७ धावा केल्या. त्याला स्टार्कनेच पॅव्हेलियनमध्ये पाठवले. ७० धावांवर दोन गडी गमावलेल्या दक्षिण आफ्रिका संघाला मोठ्या भागीदारीची गरज होती. त्यानंतर एडन मार्करमने टेंबा बावुमासोबत शतकी भागीदारी करत विजयाचा पाया रचला. काल तिसऱ्या दिवसाअखेर या दोन्ही फलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेची धावसंख्या २ बाद २१३ वर पोहोचवली होती. दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी ६९ धावांची गरज होती. आज खेळ सुरू होताच टेंबा बावुमा ६६ धावा करून बाद झाला. मात्र दुसऱ्या बाजूने मार्करम संयमी खेळी करत होता. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी त्याला बाद करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी ५ धावांची गरज असताना हेझलवुडने त्याला बाद केले. त्यानंतर डेव्हिड बेडिंगहॅम आणि काइल व्हेरेन या जोडीने दक्षिण आफ्रिकेची धावसंख्या ५ बाद २८२ वर नेली. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियावर ५ गडी राखत आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपवर ठसा उमटवला. » सविस्तर वृत्त पान-४ वर

## गोवंडी शिवाजीनगरात डंपरने चौघांना चिरडले! तिघे ठार

■ मुंबई

**गोवंडी** शिवाजीनगर परिसरात आज दुपारच्या सुमारास डंपरने चार जणांना चिरडले. या भीषण अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. तर एक जण गंभीररित्या जखमी झाला आहे. अपघातानंतर स्थानिक रहिवासी मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरले. त्यांनी डंपरच्या चालकाला पकडून चोप दिला. यावेळी काहींनी डंपरची तोडफोड केली. त्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला. पोलिसांनी डंपर चालकाला ताब्यात घेतले आहे.

घाटकोपर मानखुर्द जोडरस्त्यावर शिवाजीनगर भागात हा अपघात झाला. या मार्गावरील वाहतुकीची काही काळ कोंडी झाली. घटनेचे वृत्त कळताच घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी संतप्त जमावाला पांगवण्याचा प्रयत्न केला असता रहिवाशांनी रस्त्यावर काही वेळ ठिय्या आंदोलन केले. त्यामुळे दोन तास वाहतूक विस्कळीत झाली होती.

## व्हेज-नॉनव्हेज स्वतंत्र शिजवा अन्न प्रशासनाचा रेस्टॉरंटना आदेश
### नियमाचा भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार

■ मुंबई

**शाकाहारी** आणि मांसाहारी अन्नपदार्थांची साठवणूक व प्रक्रिया स्वतंत्रपणे करणे बंधनकारक आहे. अन्न सुरक्षा कायद्यानुसार याचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट आणि उपाहारगृहांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिला आहे.

राज्यभरातील अन्न आस्थापनांमध्ये अन्न साठवण आणि स्वयंपाक प्रक्रिया एकत्रित केल्याच्या तक्रारी वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही कारवाई सुरू केली आहे. नार्वेकर म्हणाले की, अन्न



शिजवणे व साठवणीच्या टप्प्यावर शाकाहारी व मांसाहारी अन्नासाठी स्पष्टपणे स्वतंत्र व्यवस्था असावी. या अन्नसुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांचा परवाना रद्द करणे, दंड आकारणे अशी कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. राज्यभरातील हॉटेल, रेस्टॉरंट व उपाहारगृहांमध्ये नियमित तपासण्या केल्या जात आहेत. अन्नसुरक्षा ही केवळ कायदेशीर बाब नसून ती ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे. नियमभंग करणाऱ्या अन्न व्यावसायिकांना त्वरित नोटीस देऊन कडक कारवाई केली जात आहे.

## राजा रघुवंशीच्या पिंडदानाला सोनमचा भाऊ उपस्थित
### क्षिप्रा नदी किनारी तर्पण विधी झाला

■ इंदूर

**हनिमूनच्या** बहाण्याने मेघालयला नेऊन पत्नीनेच हत्या घडवून आणलेले इंदूरचे व्यावसायिक राजा रघुवंशी यांच्या कुटुंबियांनी उज्जैनमध्ये क्षिप्रा नदीच्या तीरावर पिंडदान आणि तर्पण विधी केला. विशेष म्हणजे राजा रघुवंशी यांची पत्नी सोनमचा सख्खा भाऊ गोविंद या पिंडदान विधीला आवर्जून हजर राहिला.

राजा रघुवंशी हत्येचे सत्य पोलीस तपासातून बाहेर येताच सोनमने आपणच आपल्या पतीची हत्या केल्याची कबुली दिली. तेव्हापासून तिचा सख्खा भाऊ गोविंद तिच्याविरुद्ध उभा ठाकला. सोनमने खरोखरच



राजाची हत्या केली असेल तर तिला कठोरात कठोर शिक्षा व्हायला पाहिजे, असे गोविंद याने म्हटले होते. या खटल्यात आपण आपल्या बहिणीच्या नव्हे तर राजा रघुवंशी कुटुंबियांची साथ देणार असे त्याने सांगितले.

पिंडदानाला हजर राहून त्याने आपण आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे गोविंद याने दाखवून दिले. सोनमचे राज कुशवाहशी प्रेम आहे हे जर तिने आम्हाला सांगितले असते तर आम्ही तिला त्याच्याशी लग्न करू दिले असते. पण सोनमने आम्हाला अंधारात ठेवले आणि नको ते कृत्य करून बसली, असे गोविंद म्हणाला.

## विक्रोळी उड्डाणपूल खुला! ३ पक्षांचे श्रेयाचे सोहळे

■ मुंबई

**पूर्व** आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा विक्रोळी उड्डाणपूल अखेर आज नागरिकांसाठी खुला करण्यात आला. आज सायंकाळी चार वाजल्यापासून वाहतुकीसाठी खुला झालेल्या या पुलामुळे प्रवासात सुमारे ३० मिनिटांची बचत होणार आहे. मात्र या उड्डाणपुलावरून श्रेयवादाची लढाई सुरू झाली. भाजपा, शिंदे गट आणि उबाठा या तिन्ही गटांनी बॅनरबाजी करून आणि मोर्चे काढून हे काम आपण केल्याचा दावा केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी काल एक्स वर म्हटले की, मी मुख्यमंत्री असताना २०१८ मध्ये या कामाचे आदेश दिले होते. १०४.७७ कोटी रुपये त्यावर खर्च करण्यात आला. येणाऱ्या काळात पाऊस लक्षात घेता मुंबईकरांची कोणतीही गैरसोय होऊ नये, म्हणून हा पूल १४ जून रोजी दुपारी ४ वाजतापासून वाहतुकीसाठी खुला करावा, असे निर्देश आम्ही बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त आणि पोलिसांना दिले आहेत. त्यानंतर आज सकाळी सर्वप्रथम उबाठाचे आमदार सुनील राऊत यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह येऊन पुलाचे उद्घाटन केले. त्यानंतर शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी या पुलाचे उद्घाटन केले. शेवटी भाजपा कार्यकर्त्यांनी पुलावर रॅली काढत घोषणाबाजी केली. शिंदे गटाच्या उद्घाटनाबाबत विचारले असता भाजपाचे नेते दीपक दळवी यांनी थेट उत्तर देणे टाळले. त्यांनी म्हटले की, आज आमच्यासाठी आनंदाचा दिवस आहे. हा पूल म्हणजे फडणवीसांनी विक्रोळी, भांडूप, कांजूर भागातील नागरिकांना दिलेली भेट आहे. आम्ही त्यांचे आभार मानण्यासाठी येथे जमलो आहोत. उबाठा गटाच्या हस्तेही उद्घाटन झाल्याबद्दल विचारले असता दळवी म्हणाले, त्यांचा या प्रकल्पाशी काही संबंधच नाही. २०१८ मध्ये फडणवीस मुख्यमंत्री असताना या पुलाच्या कामाला मान्यता दिली होती आणि आता त्यांच्या आदेशानुसार तो नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. श्रेय घेणे हाच त्यांचा नेहमीचा उद्योग आहे.



Email-navakal.1923@gmail.com ▸ www.navakal.in ▸ /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

ठाणे माजिवाडासाठी ड्रायव्हर (पार्किंगसाठी) पाहिजेत. 10 तास ड्युटी पगार 20000/- + 4 सुट्ट्या, ठाणे वागळे इस्टेटसाठी सिक्युरिटीगार्ड पाहिजेत. पगार 15000/- ड्युटी 12 तास - **9819271404** {NC251075}

8/10/24 तास बेबीकेअरसाठी अनुभवी बाई / मुली पाहिजेत, **79775 30720 / 9136383011** {NC251074}

हेडलबर्ग 20x29 टूकलर मशीनसाठी प्रिंटर आणि फिडरमेन पाहिजेत. अंधेरी (पूर्व), महाकाली - **9920360152** {NC251120}

प्रभादेवीतील कंपनीला कापड लॉडिंग डिलिव्हरीसाठी हेल्पर पाहिजेत. कॉल **9082746846** {NC251132}

इमिटेशन ज्वेलरी पॅकिंगसाठी मालाड (वेस्ट)मध्ये मुलगी पाहिजे **9820109581** {NC251134}

कांदिवली आणि रेरोडसाठी हेल्पर्स पाहिजेत. ड्युटी 8 तास. पगार रोज 500/- **9619291288** {NC251129}

**हिंदुस्तान सिक्युरिटी फोर्स (हिंसेफ)**
Since 1976
Govt. Licensed & Regd.
Urgent मोठ्या संख्येने भरती
चर्चगेट ते पालघर,
सीएसटी ते कर्जत
मुंबई, नवी मुंबई आणि पुणे साठी संपर्क साधा।
आवश्यक कागदपत्रे - आधार कार्ड, पॅन कार्ड, शिक्षण प्रमाणपत्र आणि पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र. मुंबईबाहेर भरतीसाठी येणारे आधार कार्ड, पॅन कार्ड, शिक्षण प्रमाणपत्र, (पोलीस चारित्र्य प्रमाणपत्र) - Dist Superintendent of Police द्वारे प्रमाणित आणा.
सुरक्षा रक्षक + पर्यवेक्षक + अधिकारी
पगार- २८,२८७/- रुपये
*वय - १८ ते ३५ वर्षे*
*शिक्षण आठवी पास*
दरमहा सरकारी सुविधा - (बेसिक + डीए + भत्ता) = १९,०००/-)
८ तासांची ड्युटी - पीएफ १२% + पेन्शन, बोनस, २१ दिवसांचा रजा पगार, ईएसआयसी, ग्रॅच्युइटी, ४ राष्ट्रीय सुट्ट्या, गरजेनुसार नोकरीच्या दरम्यान राहण्याची सोय.
* संपर्क साधा - Sagar Samrat, 31A- M.K. Road, Opp-Charni Road Stn OPP Platform no 4, Charni Road-E, Mumbai – 400 004, वेळ - सकाळी ८:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत
फोन - 9322096476, 9930320513, 9892627379, 9167746476, 9518584397, 8976561636
ईमेल - <hinsef@hotmail.com>
कायम नोकरी, *भरती नेहमीच खुली असते.

मेंटेनन्स आणि वायरिंगसाठी इलेक्ट्रिशियन पाहिजेत, चार बंगलो अंधेरी वेस्ट मध्ये - **8879138869** {NC251130}

विरार ते दादरसाठी डिलिव्हरीबॉईज पाहिजेत. पगार 16000/- ते 21000/- संपर्क - **9324996045** {NC251135}

10 तासासाठी ठाण्यात अनुभवी आयाबाई वॉर्डबॉयची आवश्यकता. **8451091740 / 8097813266** {NC251136}

त्वरित पाहिजेत 04 ड्रायव्हर आणि 04 डिलिव्हरी बॉयस घाटकोपर वेस्ट 17 गुड वूड बिल्डिंग पाटणवाला कंपाऊंड, संपर्क - **9920650797** {NC251137}

रिअल इस्टेटच्या ऑफिस कामासाठी टॅलि कॉलिंगसाठी अनुभवी मुली/महिला पाहिजेत. कामतसर : **7700918713** {NC251029}

बोरीवली कंपनीमध्ये Staff पाहिजेत. अकाऊंट असिस्टंट मुलगी पगार 12000/- to 15000/- (टॅलीचा अनुभव पाहिजे), डिलिव्हरीसाठी मुलगा पगार 12000/- to 15000/- पॅकिंगसाठी मुलगी पगार 9000/- संपर्क- **8356947277, 9321234659** {NC251150}

दहिसर ईस्ट इमिटेशन कामासाठी मुली पगार 350-450 **9920062894 / 9833006198**{NC251145}

कार्यालयीन कामकाजासाठी मराठी डिटीपी ऑपरेटर व हेल्पर मुली किंवा महिला पाहिजेत. संपर्क करा : **9372778796** {NC251165}

हेडलबर्ग 2 कलर ऑफसेट प्रिंटर पाहिजेत - 2, पगार - 22,000/- मीरारोड ईस्ट राहण्याची सोय आहे.मोबाईल : **8082888805** {NC251153}

डोंबिवली येथे ड्रायव्हर त्वरित पाहिजे. अंबरनाथ, उल्हासनगर विठ्ठलवाडी यांना प्राधान्य. **9764276164.** {NC251086}

## पाहिजेत

पुणेयेथे कामासाठी इलेक्ट्रिशियन आणि हेल्पर पाहिजेत. राहणे खाणे फ्री - संपर्क **9819017462 / 9820432190** {NC251103}

**वसई** येथील नामांकित केमिकल व कोटिंग पेंट कंपनीसाठी पाहिजेत
**हेल्पर (५)**
केमिकल कंपनीसाठी शिक्षण १०वी / १२वी पास (फक्त पुरुष)
कामाची वेळ ८ तास रविवारी बंद
वय मर्यादा १८ ते ३५ (बस सुविधा उपलब्ध)
संपर्क
प्रोग्रेसिव सरफेस सिस्टम प्रा.ली.
पत्ता : प्लॉट नं. ६६/७८, सेक्टर-१, वसई तालुका, इंडस्ट्रीयल इस्टेट, गवराईपाडा, वसई (पुर्व)
फोन. 0250- 6690000
सुधीर राणे: 9819649937
विधी: 7977884280

आयुर्वेदिक उत्पादनांच्या विक्रीकरिता अनुभवी / बिनाअनुभवी सेल्सगर्ल / महिला पाहिजेत. कमवा 15,000 ते 20,000 संपर्क : **9029361348 / 8976442344** {NC251079}

5 वर्षे अनुभवी टॅटू आर्टिस्ट पाहिजे. पगार योग्यतेनुसार तारा टॅटू, ओल्ड नागरदास रोड, अंधेरी ईस्ट, **9322279793** {NC251172}

ग्राफिक डिझायनर व डीटीपी ऑपरेटर (5 जागा) डिझाइन हाऊससाठी कोरल ड्रॉ, फोटोशॉप, इलस्ट्रेटरवर कामाचा 5+ वर्ष अनुभव - **9324804793** {NC251177}

प्रिन्टींग प्रेस मध्ये पंचिंग (Punching) ऑपरेटर पाहिजे (भायखळा) **9819551478** {NC251178}

## Situation Vacant

SECOND EARNING for Retired, VRS, Bankers, Professionals, Qualified Housewives. Salary +PF +Medical cover. Age 40-65. SSC pass+ onwards. : **9324444089** {NC251140}

Job Vacancy for Marathi (Comp Typist near Versova Metro, Andheri West, Call **9870285092** {NC251173}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC250861}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OPERATION THEATRE, INTENSIVE CARE UNIT, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 8850530054** {NC250612}

## जागा विषयक

परेल, शिवडी, भोईवाडा, नायगाव, हिंदमाता, शिंदेवाडी, दादर, शिवाजीपार्क, प्रभादेवी, वरळी, लोअर परेल, लालबाग, चिंचपोकळी, काळाचौकी, खोली, फ्लॅट, दुकाने, खरेदी / विक्री/ भाड्याने **9222172964** {NC251142}

कोकणात घर शोधताय? लांजा तालुक्यात रेडी बंगला विकणे आहे - **8291525354** {NC251171}

## प्रॉपर्टी विषयक

भव्य घरकुल योजना, मंगलमूर्ती अपार्टमेंट, G+5 एरिया 550-25 लाख. बुकिंग 1,00,000, 80% कर्ज. नालासोपारा पश्चिम. **9870316444 / 9833163704** {NC251031}

## वधु -वर मेळावा

वधु-वर मेळावा सर्व जाती मुलींना मोफत नोंदणी कल्याण - **9869868620** {NC251128}

## विवाह विषयक

मुंबईमध्ये महिला जीवनसाथी पाहिजे. विधवा, घटस्फोटीत चालेल. वय 40 - 45, जातीची अट नाही. मुंबई **9324774986** {NC251174}

## वर पाहिजे

गरीब कुटुंबातील मुलगी 27, 10वी, भांड्यांच्या दुकानात कामाला 10,000/- (जात-मराठा) आंतरजातीय चालेल. अपेक्षा : होतकरू मुलगा हवा. **7709846590** {NC251162}


# सरकारच्या लेखी आश्वासनानंतर बच्चू कडूंचे आंदोलन स्थगित

पान ८ वरून

दिव्यांगांच्या मानधनवाढीबाबत ३० जूनच्या पुरवणी बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल. उर्वरित मुद्यावर संबंधित मंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊन मागण्या निकाली काढल्या जातील.

बच्चू कडू म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार कर्जमाफीबद्दल बोलत नव्हते. पण प्रहार कार्यकर्त्यांच्या आंदोलनानंतर समिती तयार करू, असे आश्वासन त्यांनी दिले. ही आपली ताकद आहे. सरकार अजूनही कर्जमाफीची तारीख सांगत नाही. दिव्यांगाचे घर १५०० रुपयांत कसे चालेल? राम ठाकरे या शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर मी शेतकऱ्यांसाठी पहिल्यांदा उपोषण केले. सरकार राम मंदिरासाठी सर्व काही करत आहे. पण या रामहत्येचे पाप कसे फेडणार? मी केवळ माझ्या शेतकऱ्यांसाठी उपोषण स्थगित करत आहे. त्यांनी मला उपोषण सोडले नाही तर आत्महत्या करू असे संगितले. ऑक्टोबर महिन्यात खाऊन पिऊन हा बच्चू कडू पुन्हा आंदोलन करणार आहे. जे मंत्री मला भेटून गेले त्यांनीही मला काही आश्वासन दिले आहे. त्यामुळे जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर मी मुंबई बोलून नागपुरात आंदोलन करेन. जर कोणी दिलेला शब्द पाळला नाही तर मंत्र्यांच्या घरासमोर आंदोलन करेन.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे बच्चू कडू यांच्या उपोषणावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, सरकारकडे त्यांनी केलेल्या मागण्यांवर येत्या मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करण्यात येईल. शेतकरी कर्जमाफीसंदर्भात लवकरच उच्चस्तरीय समिती नेमली जाईल. दिव्यांग बांधवांच्या अनुदान वाढीसंदर्भात विधिमंडळाच्या येणाऱ्या अधिवेशनात आर्थिक तरतूद वाढवून देऊ.

दरम्यान, पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यक्रमात प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. कर्जमाफी कधी करणार, असा जाब यावेळी कार्यकर्त्यांनी पवारांना विचारला. यावेळी आंदोलकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. अजित पवार यांनी त्यांच्या मागण्या ऐकल्या आणि पोलिसांना आंदोलकांना बाहेर घेऊन जा, असे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी ९ आंदोलकांना ताब्यात घेतले.

# लातूर जिल्ह्यात घोड्यांना 'ग्लँडर्स' आजाराची लागण

लातूर

**लातूर** जिल्ह्यात घोड्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून 'ग्लँडर्स' नावाच्या संसर्गजन्य आजाराची लागण झाली आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे. कारण यातून माणसांमध्येही पसरणाऱ्या झूनॉटिक रोगाचा प्रादुर्भाव होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. घोड्याला झालेल्या या आजाराच्या पार्श्वभूमीवर काल जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या निर्देशानुसार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला पशुसंवर्धन, आरोग्य, पोलीस, नगरपालिका विभागांचे अधिकारी तसेच जिल्ह्यातील घोडामालक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लातूर जिल्ह्यात एक घोडा ग्लँडर्स पॉझिटिव्ह आढळला असून, चार घोडे संशयित म्हणून ओळखले गेले आहेत. ग्लँडर्स आणि फारसी कायदा १८९९, राष्ट्रीय अश्व कृती योजना २०१९ आणि प्राण्यांतील संसर्गजन्य व संक्रमक रोग अधिनियम २००९ यांच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश काढून बाधित घोड्याला शास्त्रशुद्ध पद्धतीने दयामरण देण्यात आले.

# भाजपा आमदार संजय कुटेंचे घर पेटवून देण्याचा प्रयत्न

जळगाव

**अतिवृष्टीमुळे** झालेल्या शेतीच्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळाल्याने संतापलेल्या संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर गावच्या एका शेतकऱ्याने भाजपा आमदार संजय कुटे यांचे घर पेट्रोल टाकून पेटवून देण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित शेतकऱ्याला अटक केली आहे. ही घटना शुजळगाव जामोद येथील आमदार कुटे यांच्या निवासस्थानी घडली. यावेळी आमदार कुटे हे घरात उपस्थित होते. दरम्यान संतप्त शेतकरी हातात पेट्रोलचे कॅन घेऊन बंगल्याच्या प्रवेशद्वाराजवळ आला आणि नुकसान भरपाई मिळाली नाही म्हणून हा बंगला जाळून टाकतो असा इशारा दिला. त्यानंतर तो बंगल्याच्या प्रवेशद्वाराकडे आला.

# शेतकरी कर्जमाफीचा विषय भाजपाच्या जाहीरनाम्यातच नव्हता

हिंगोली

**- मंत्री अतुल सावेंचा दावा**

**शेतकऱ्यांच्या** कर्जमाफीचा कोणताही मुद्दा आमच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात नव्हता, असा खळबळजनक दावा राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि भाजपा नेते अतुल सावे यांनी केला आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर भाजपाने कर्जमाफीच्या बाबतीत फसवणूक केली का, असा प्रश्न विचारला जात आहे. मंत्री सावे आज हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत प्रश्न विचारला असता, त्यावर उत्तर देताना सावे म्हणाले की, आमच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात कर्जमाफीचा मुद्दाच नव्हता. तुम्ही स्वतः जाहीरनामा तपासून पाहू शकता. आम्ही ज्या बाबी जाहीरनाम्यात नमूद केल्या आहेत, त्या प्राधान्यक्रमाने पूर्ण करत आहोत.

# इराण-इस्त्रायलमध्ये तुंबळ युद्ध एकमेकांवर तुफान हवाई हल्ले

पान १ वरून

क्षेपणास्त्रे डागली. या हल्ल्याला इराणने ऑपरेशन ट्रू प्रॉमिस असे नाव दिले. या हल्ल्यामुळे दोन्ही शहरांमध्ये हवाई हल्ल्याचे सायरन वाजले. त्यानंतर सरकारने लोकांना बंकरमध्ये आश्रय घेण्याचे आवाहन केले. इराणच्या हल्ल्यात ३ जण ठार आणि ९० हून अधिक जखमी झाल्याचे सांगितले जात आहे. अनेक घरांचेही मोठे नुकसान झाले. मात्र, इस्त्रायली सरकारने अद्याप या हल्ल्यात किती लोकांचा मृत्यू झाला आहे हे सांगितले नाही. इराणकडून बॅलिस्टिक डझनभर क्षेपणास्त्रे डागण्यात आली होती. त्यापैकी बहुतेक क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट केली.

एवढीच माहिती इस्त्रायली सैन्याने दिली आहे. पण इस्त्रायलमध्ये अनेक ठिकाणी मदत आणि बचावकार्य सुरू आहे, यावरून इस्त्रायलचे मोठे नुकसान झाल्याचे म्हटले जात आहे. इराणने इस्त्रायली संरक्षण मंत्रालयावरही निशाणा साधल्याचे म्हटले जात आहे. परंतु इस्त्रायलने त्याची पुष्टी केली नाही. इराणकडून हल्ल्याची शक्यता असल्याने इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले.

इराणच्या हल्ल्यानंतर इस्त्रायली लढाऊ विमानांनी आज पुन्हा इराणच्या अणुस्थळांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमध्ये इराणच्या दोन लष्करी अधिकाऱ्यांसह आणखी ६० जणांचा मृत्यू झाला. इस्त्रायली हल्ल्यात आतापर्यंत १३८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ३५० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. इस्त्रायलच्या नव्या हल्ल्यात आपल्या फार्दो येथील आण्विक तळाचे नुकसान झाल्याचे इराणने कबूल करत म्हटले की, महत्त्वाची उपकरणे आणि ऐवज आम्ही आधीच हलवला होता.

# डीजीसीएने एअर इंडियाला आधीच इशारा दिला होता

पान १ वरून

पध्दतीने होत आहेत आणि इतर त्रुटीही आहेत असे अनेकदा इशारे देण्यात आले. त्यामुळे यावेळीही एअर इंडियाने देखरेखीच्या प्रक्रियांचे पालन नेमके कसे केले असा प्रश्न आता निर्माण होतो.

डीजीसीएने एअर इंडियाला सूचना केल्या होत्या की, फ्युएल पॅरामीटर मॉनिटरिंग, केबिन एअर कॉम्प्रेसर, इलेक्ट्रॉनिक इंजिन कंट्रोल, इंजिन फ्युएल आणि हायड्रोलिक सिस्टम यांची एकदा तपासणी करण्याबाबत सांगितले. याव्यतिरिक्त टेक ऑफ पॅरामीटर आणि पॉवर अॅश्युरन्स यांचीही तपासणी करायला सांगितली होती. विमान हवेत असताना फ्लाईट कंट्रोलचीही तपासणी करण्याची सूचना केली होती.

# राज्यभरात मुसळधार पाऊस हिंजवडी आयटी पुन्हा जलमय

पुणे

**पिंपरी**-चिंचवडमधील आयटी हब हिंजवडी पुन्हा एकदा पावसात जलमय झाले. गेल्या शनिवारीही हिंजवडी परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. काही ठिकाणी पावसाच्या पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे दुचाकी वाहून गेल्या होत्या. राज्यभरातही मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले.

काल रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळे हिंजवडीतील रस्त्यांना नद्यांचे स्वरूप प्राप्त झाले. यामुळे रात्री घरी परतताना कर्मचाऱ्यांना त्याचा फटका बसला. अनेक दुचाकी आणि चारचाकी पाण्यात अडकल्या होत्या. काही ठिकाणी गुडघ्यापर्यंत पाणी साचले होते. मुंढवा, खराडी, हडपसर, फुरसुंगी, कोंढवा, कात्रज, धनकवडी, बिबवेवाडी, सिंहगडरस्ता, कोथरूड, बावधन, औंध, बोपोडी, पाषाण या भागांमध्ये विजेच्या गडगडाटासह पावसाने हजेरी लावली. पुण्यात २४ तासांत ५२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. हवामान खात्याने पुढील काही दिवस पावसाचा इशारा दिला आहे. आज पालकमंत्री अजित पवार यांनी पुण्यात जाऊन पावसाचा आढावा घेतला. अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करा अशा सूचना दिल्या. सोलापुरातील अक्कलकोट तालुक्यातील आरळी गावातील पूल वाहून गेला. आरळी - दर्शनाळ - मुस्ती या मार्गावरील पूल वाहून गेल्याने ग्रामस्थांचे आंदोलन केले. मंठा तालुक्यातील गारठेकी गावात सुट्टीवर आलेल्या जवानाचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. नाशिकमधील मनमाडमध्ये विजेचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली.

## महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 24 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 14/06/2025

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 4573 सुमित एजन्सी - मुंबई | 5137 | 9217 | 8559 | 4023 श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5029 | 9456 | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2875 | 4442 हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा | 7953 | 8452 | 9032 | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0242 | 1116 | 1351 | 1656 | 3208 | 4407 | 5457 | 7141 | 8953 | 8997 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2363 | 2525 | 4520 | 5703 | 6264 | 6269 | 6538 | 7587 | 8391 | 9333 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 300/- | 0678 | 1573 | 2472 | 3019 | 4170 | 5064 | 5847 | 7047 | 7995 | 9329 |
| | 0794 | 1611 | 2529 | 3125 | 4183 | 5085 | 5880 | 7138 | 8018 | 9352 |
| 0004 | 0806 | 1664 | 2563 | 3135 | 4194 | 5092 | 5892 | 7166 | 8036 | 9385 |
| 0006 | 0890 | 1703 | 2572 | 3323 | 4209 | 5162 | 5904 | 7187 | 8038 | 9459 |
| 0017 | 0967 | 1717 | 2623 | 3335 | 4264 | 5274 | 6139 | 7278 | 8239 | 9543 |
| 0039 | 0970 | 1774 | 2678 | 3353 | 4354 | 5300 | 6163 | 7281 | 8268 | 9549 |
| 0150 | 0999 | 1798 | 2682 | 3389 | 4408 | 5326 | 6222 | 7370 | 8347 | 9609 |
| 0186 | 1114 | 1811 | 2706 | 3593 | 4413 | 5350 | 6267 | 7375 | 8348 | 9649 |
| 0187 | 1118 | 1912 | 2712 | 3637 | 4414 | 5368 | 6314 | 7388 | 8415 | 9709 |
| 0298 | 1119 | 1919 | 2715 | 3651 | 4440 | 5390 | 6468 | 7464 | 8558 | 9737 |
| 0308 | 1132 | 1969 | 2719 | 3779 | 4476 | 5394 | 6546 | 7666 | 8568 | 9871 |
| 0392 | 1133 | 2042 | 2734 | 3853 | 4488 | 5554 | 6572 | 7726 | 8655 | 9903 |
| 0504 | 1186 | 2062 | 2738 | 3892 | 4536 | 5556 | 6695 | 7761 | 8662 | 9909 |
| 0554 | 1329 | 2097 | 2806 | 3903 | 4679 | 5566 | 6759 | 7767 | 8698 | 9934 |
| 0604 | 1383 | 2123 | 2832 | 3938 | 4747 | 5619 | 6783 | 7794 | 8788 | 9943 |
| 0610 | 1484 | 2212 | 2922 | 3943 | 4758 | 5726 | 6803 | 7862 | 8846 | 9956 |
| 0613 | 1486 | 2231 | 2972 | 4035 | 4943 | 5757 | 6862 | 7941 | 8923 | 9962 |
| 0640 | 1568 | 2233 | 2983 | 4040 | 4947 | 5769 | 6879 | 7964 | 9099 | 9970 |
| 0648 | 1571 | 2250 | 2999 | 4063 | 5056 | 5780 | 6963 | 7994 | 9215 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शनिवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 24 — सोडत दिनांक 14/06/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **ML-09 : 6968**

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **6968** — रुखमणी एन्टरप्रायझेस - औरंगाबाद, विशेष डिस्ट्रिब्युटर - गोरेगाव, प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2515 | 2544 | 5567 | 5707 | 5852 | 6632 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1623 | 2137 | 2405 | 4383 | 5123 | 5641 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2145 | 3120 | 3698 | 4863 | 5434 | 5725 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1324 | 2086 | 3879 | 4099 | 4413 | 5171 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1813 | 2246 | 2746 | 3239 | 3583 | 4002 | 4324 | 4677 | 5192 | 5573 | 6008 | 6466 |
| | | 1816 | 2248 | 2767 | 3240 | 3618 | 4019 | 4336 | 4684 | 5198 | 5574 | 6019 | 6495 |
| 1001 | 1313 | 1821 | 2261 | 2770 | 3244 | 3630 | 4036 | 4347 | 4688 | 5220 | 5586 | 6025 | 6507 |
| 1010 | 1317 | 1838 | 2265 | 2775 | 3250 | 3636 | 4048 | 4349 | 4740 | 5222 | 5589 | 6036 | 6550 |
| 1034 | 1321 | 1854 | 2269 | 2782 | 3254 | 3638 | 4049 | 4368 | 4745 | 5250 | 5591 | 6038 | 6589 |
| 1047 | 1366 | 1861 | 2298 | 2784 | 3280 | 3656 | 4057 | 4377 | 4760 | 5253 | 5593 | 6056 | 6600 |
| 1078 | 1367 | 1874 | 2302 | 2787 | 3294 | 3657 | 4060 | 4383 | 4784 | 5264 | 5597 | 6058 | 6616 |
| 1081 | 1407 | 1881 | 2308 | 2802 | 3297 | 3679 | 4073 | 4409 | 4803 | 5275 | 5657 | 6061 | 6618 |
| 1082 | 1412 | 1891 | 2314 | 2822 | 3305 | 3708 | 4084 | 4415 | 4807 | 5278 | 5667 | 6063 | 6622 |
| 1091 | 1420 | 1897 | 2328 | 2829 | 3306 | 3735 | 4104 | 4416 | 4830 | 5293 | 5675 | 6081 | 6634 |
| 1098 | 1448 | 1910 | 2349 | 2832 | 3317 | 3739 | 4107 | 4417 | 4832 | 5344 | 5682 | 6091 | 6637 |
| 1100 | 1461 | 1911 | 2351 | 2848 | 3323 | 3768 | 4114 | 4428 | 4834 | 5377 | 5695 | 6099 | 6641 |
| 1128 | 1471 | 1913 | 2367 | 2881 | 3331 | 3780 | 4116 | 4433 | 4837 | 5382 | 5723 | 6100 | 6645 |
| 1135 | 1472 | 1930 | 2372 | 2892 | 3332 | 3783 | 4122 | 4435 | 4849 | 5395 | 5757 | 6140 | 6648 |
| 1141 | 1487 | 1991 | 2377 | 2900 | 3334 | 3786 | 4132 | 4438 | 4861 | 5398 | 5759 | 6155 | 6651 |
| 1144 | 1515 | 1993 | 2382 | 2902 | 3336 | 3802 | 4149 | 4440 | 4891 | 5404 | 5765 | 6166 | 6652 |
| 1154 | 1526 | 2008 | 2383 | 2922 | 3337 | 3807 | 4168 | 4445 | 4894 | 5422 | 5777 | 6179 | 6666 |
| 1156 | 1557 | 2020 | 2386 | 2931 | 3338 | 3822 | 4171 | 4446 | 4898 | 5436 | 5778 | 6207 | 6668 |
| 1158 | 1564 | 2067 | 2387 | 2950 | 3346 | 3836 | 4188 | 4451 | 4925 | 5440 | 5785 | 6230 | 6675 |
| 1160 | 1601 | 2128 | 2411 | 2972 | 3348 | 3888 | 4194 | 4454 | 4931 | 5452 | 5797 | 6237 | 6676 |
| 1162 | 1610 | 2133 | 2412 | 2992 | 3361 | 3902 | 4203 | 4490 | 4947 | 5500 | 5805 | 6239 | 6677 |
| 1186 | 1666 | 2134 | 2420 | 3002 | 3367 | 3903 | 4211 | 4494 | 4951 | 5501 | 5822 | 6252 | 6697 |
| 1188 | 1689 | 2152 | 2431 | 3031 | 3374 | 3915 | 4223 | 4495 | 4976 | 5506 | 5833 | 6259 | 6706 |
| 1191 | 1691 | 2172 | 2460 | 3033 | 3396 | 3935 | 4239 | 4497 | 4977 | 5514 | 5842 | 6261 | 6730 |
| 1194 | 1711 | 2182 | 2478 | 3034 | 3424 | 3937 | 4258 | 4505 | 5004 | 5521 | 5854 | 6278 | 6738 |
| 1196 | 1712 | 2192 | 2516 | 3037 | 3432 | 3942 | 4259 | 4518 | 5005 | 5525 | 5857 | 6292 | 6761 |
| 1230 | 1713 | 2197 | 2537 | 3039 | 3459 | 3951 | 4268 | 4532 | 5009 | 5528 | 5860 | 6322 | 6764 |
| 1254 | 1719 | 2200 | 2566 | 3043 | 3464 | 3968 | 4274 | 4560 | 5051 | 5529 | 5869 | 6330 | 6766 |
| 1256 | 1734 | 2207 | 2572 | 3079 | 3476 | 3970 | 4276 | 4572 | 5053 | 5531 | 5870 | 6345 | 6767 |
| 1258 | 1735 | 2209 | 2584 | 3087 | 3493 | 3973 | 4280 | 4575 | 5074 | 5545 | 5882 | 6386 | 6796 |
| 1271 | 1736 | 2210 | 2588 | 3088 | 3500 | 3979 | 4290 | 4597 | 5075 | 5548 | 5888 | 6391 | 6798 |
| 1273 | 1761 | 2222 | 2590 | 3093 | 3504 | 3986 | 4295 | 4598 | 5111 | 5549 | 5949 | 6415 | 6863 |
| 1281 | 1767 | 2223 | 2672 | 3126 | 3529 | 3987 | 4300 | 4609 | 5141 | 5552 | 5952 | 6429 | 6864 |
| 1283 | 1768 | 2226 | 2688 | 3167 | 3543 | 3988 | 4302 | 4630 | 5145 | 5563 | 5953 | 6434 | 6924 |
| 1301 | 1785 | 2230 | 2690 | 3203 | 3547 | 3997 | 4307 | 4648 | 5175 | 5567 | 5995 | 6442 | 6930 |
| 1306 | 1812 | 2239 | 2709 | 3237 | 3558 | 4001 | 4321 | 4649 | 5182 | 5571 | 6006 | 6463 | 6987 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यावयाचा आहे, याची नोंद घ्यावी. - मॅनेजर, 'नवाकाळ'


# अहमदाबाद विमान अपघातात आणखी एक मृतदेह सापडला

पान ८ वरून

आहेत. २७० जणांचे शवविच्छेदन पूर्ण झाले आहेत. आतापर्यंत केवळ ८ मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.


या अपघाताचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. यामध्ये विमान नागरी वस्तीच्या अगदी जवळून जाताना व काही क्षणांत कोसळताना दिसत आहे. हा व्हिडिओ इतक्या अचूक वेळेस कोणी शूट केला, यावरून सोशल मीडियावर प्रश्न उपस्थित झाले. हा व्हिडिओ आर्यन नावाच्या तरुणाने रेकॉर्ड केला होता. तो नुकताच गावावरून अहमदाबादला नातेवाईकांकडे परतला होता. आर्यनला विमान आकाशातून जाताना पाहून कुतूहल वाटले आणि त्याने व्हिडिओ शूट करण्यास सुरुवात केली. मी गावातील मित्रांना दाखवण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्ड करत होतो. विमानाच्या स्फोटाचे दृश्य मी पाहिले आणि हादरलो, असे त्याने पोलिसांना सांगितले. आर्यनने स्पष्ट केले की, तो केवळ उत्सुकतेपोटी व्हिडिओ रेकॉर्ड करत होता. पोलिसांनी त्याला सध्या चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

# उबाठाच्या किशोरी पेडणेकरना मनसेचे निमंत्रण! पुन्हा चर्चा

पान १ वरून

महिला आहे हे तुम्हाला माहिती नव्हते का? असा सवाल त्यावेळी देशपांडे यांनी पत्रकार परिषद घेत केला होता. २०२४ विधानसभा निवडणुकीच्या काळात रत्नसिंधू इमारतीत संदीप देशपांडे यांनी बैठक घेऊन पैसे वाटप केले असा आरोप सहा महिन्यांपूर्वी किशोरी पेडणेकर यांनी केला होता. त्यावर देशपांडे प्रत्युत्तर देत म्हणाले की, किशोरी पेडणेकर यांचे नाव घेताच मला खूप भीती वाटते. त्या डोक्यावर पडलेल्या आहेत. आदित्य ठाकरेंचा पराभव होणार आहे. म्हणून त्या खोटे आरोप करीत आहेत. एकमेकांवर असे गंभीर आरोप - प्रत्यारोप करणारे संदीप देशपांडे आणि किशोरी पेडणेकर हे अचानक वॉशिंग मशीनमध्ये जाऊन मनसेच्या रक्तदान शिबिरात आज एकत्र आले. त्यामुळे राजकीय समीकरणांबाबत नवीन चर्चेला उधाण आले.

दोन्ही भावांच्या युतीबाबत बोलताना देशपांडे म्हणाले होते की, या प्रयत्नात आमचे तोंड खुपदा पोळले आहे तेव्हा आता त्यांच्याकडून प्रस्ताव यावा. तो धागा पकडून आज युतीबाबत प्रश्नाला उत्तर देताना किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, आमची तर पाठसुद्धा पोळली आहे. आम्हालाही काही गोष्टींचा विचार करावा लागत आहे. कार्यकर्त्यांच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या उत्साहाला आमचाही पाठिंबा आहे. आधी कोण प्रस्ताव देणार यात खूप वेळ जात आहे. त्यामुळे ट्रेन कधी सुटेल सांगता येत नाही, पण मला विश्वास आहे. ट्रेन चांगल्याच स्थानकावर उभी राहील. राजकारणात जो चिखल तयार झाला आहे त्यातून कमळ सर्वांचे फलदायी नाही. युतीबाबत अंतिम निर्णय दोन्ही भावांना मिळून घ्यावा लागणार आहे. संदीप देशपांडे म्हणाले की, मी किंवा किशोरी पेडणेकर यांनी ठरवून काही होणार नाही. राज ठाकरे यांच्या मुलाखतीतून युतीचा प्रस्ताव नव्हता. याआधी आम्ही २०१४ आणि २०१७ मध्ये युतीचा प्रस्ताव दिला होता. तेव्हा सकारात्मक उत्तर देण्यात आले नाही. त्यामुळे २०२५ मध्ये आमच्याकडून प्रस्ताव जाण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. उबाठानेच प्रस्ताव द्यावा. शेवटी ठाकरे बंधूंना निर्णय घ्यावा लागणार आहे. ते ज्यावेळी ठरवतील त्यावेळी सर्व गोष्टी होतील. शिवसेना आणि मनसे कार्यकर्ते हे पक्षाच्या आदेशावर चालतात. माझ्या आणि किशोरी पेडणेकर यांच्या भेटीमुळे युती झाली असती तर आम्ही आधीच भेटलो असतो.




## महाराष्ट्र सह्याद्री — प्रभालक्ष्मी विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 24 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 14/06/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SP-07 : 3338** — पवार लॉटरी - ठाणे

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | |
|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4074 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1287 | 1621 | 5551 पवार लॉटरी - ठाणे |

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1017 | 1705 | 3148 | 4464 | 5145 |
| 1021 | 2245 | 3334 | 4513 | 5501 |
| 1172 | 2426 | 3714 | 4523 | 5555 |
| 1193 | 2491 | 3732 | 4576 | 5563 |
| 1234 | 2633 | 3768 | 4639 | 5565 |
| 1419 | 2782 | 4037 | 4640 | 5785 |
| 1553 | 2802 | 4186 | 4743 | 5867 |
| 1617 | 3131 | 4316 | 4815 | 5900 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी

निकाल — सोडत संध्या. 5:00

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 24 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 14/06/2025

पहिले बक्षिस रु. 10000/- — **MG-04 : 4490** — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3850 | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2936 | 3698 | 6115 ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे | 6645 ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे | 7949 विशेष डिस्ट्रिब्युटर, गोरेगाव |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 400/- | 1536 | 2128 | 3467 | 4564 | 5615 | 6644 | 7377 | 8252 |
| 1105 | 1580 | 2362 | 3563 | 4577 | 5725 | 6661 | 7484 | 8288 |
| 1107 | 1679 | 2375 | 3669 | 4734 | 5735 | 6687 | 7568 | 8298 |
| 1177 | 1794 | 2391 | 3759 | 4894 | 5829 | 6760 | 7569 | 8398 |
| 1191 | 1849 | 2728 | 3873 | 5139 | 5858 | 6771 | 7757 | 8739 |
| 1203 | 1900 | 2852 | 3876 | 5305 | 6240 | 6776 | 7767 | 8778 |
| 1242 | 1967 | 3072 | 4001 | 5395 | 6281 | 6886 | 7788 | 8780 |
| 1333 | 2002 | 3131 | 4334 | 5511 | 6610 | 6966 | 7890 | 8860 |
| 1501 | 2008 | 3302 | 4494 | 5557 | 6612 | 6974 | 7923 | 8979 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# गोष्ट 'दमलेल्या बाबा'ची

वडील हे मुलीची अव्यक्त आईच असतात. आई नेहमीच व्यक्त होत असते; मात्र वडील तेवढ्याच उत्कटतेने व्यक्त होत नाहीत. तरीही वडिलांच्या मनातील तीव्रता मात्र तेवढीच असते. कदाचित, दोघांचे व्यक्त होण्याचे मार्ग वेगवेगळे असतात. बाबांचे आणि मुलीचे हे खूप वेगळे नाते आहे. वडिलांना आईसारखी जवळीक मिळू शकत नाही. आपल्याकडे नेहमी असे बोललं जातं की, मुलाचं जीव लावणं हे वेगळ्या प्रकारचं असतं, तर मुलीचं जीव लावणं हे अधिक लाघवी असतं. तिची माया वेगळी असते. यानुसारच वडिलांचं आपल्या मुलीशी असणारं नातं वेगवेगळ्या रुपामध्ये व्यक्त होत असतं. बाबा हा कधी तिचा मित्र असतो, फिलॉसॉफर असतो; तर कधी मार्गदर्शक असतो. वेगवेगळ्या प्रसंगांनुसार तो वेगवेगळी भूमिका साकारत असतो.

माझी मुलगी रुमानी हिचा जन्म झाल्यानंतर लगेचच 'बाबा'पणाची जाणीव मनात निर्माण झाली होती. ती भावना निर्माण होण्यासाठी सहवास महत्त्वाचा असतो. पहिलं मूल होतं तेव्हा आपण नुकतंच कॉलेजविश्वातून, तरुणपणातून बाहेर आलेलो असतो. त्यामुळेच ही जबाबदारी झेपेपर्यंत काही काळ नक्कीच जावा लागतो. हृदयापर्यंत वडिलकीची भावना पोचायला वेळ लागतो.



■ संदीप खरे,
गीतकार-कवी

काळ जातो तसे तुम्ही मोठे होता आणि मग नात्यांचे नवे बंध उलगडू लागतात. रुमानीसुद्धा सुरुवातीच्या काळात आईकडेच जास्त असायची. ती जशी बोलायला लागली तशी थोडक्यात काय, तर असा विचार फक्त मुलंच करू शकतात. म्हणूनच माझ्या मते मुलांकडून शिकण्यासारखं खूप असतं. रुमाच्या एकेक अदा बघूनच मी 'अग्गोबाई ढग्गोबाई' या आल्बममधली सर्व गाणी लिहिली. रुमानीला लहान वयापासून माझ्या कविता आवडतात. केवळ कविताच नाही, तर गाणी ऐकणं तिला आवडतं. त्यावेळी यामधील अर्थ तिला कळायचा की नाही, हे मला माहित नाही; पण यात काहीतरी गंमत आहे, हे नक्कीच तिला जाणवतं. 'आयुष्यावर बोलू काही'चा पाचशेवा प्रयोग होता तेव्हा 'दमलेल्या बाबाची कहाणी' हे गाणं गाताना रुमा खुर्चीत बसून रडत होती. ती खूप संवेदनशील आहे.

'दूरदेशी गेला बाबा' या गाण्याला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. हे खरं असलं तरी याला दुसरी बाजूही आहे. हे गाणं ऐकताना बऱ्याच पालकांना खूप वाईट वाटायचं. काहींनी तर मला सांगितलं की, हे गाणं ऐकून आम्ही नोकरी सोडली. अर्थात, गाणं लिहिताना मला अशी प्रतिक्रिया नक्कीच अपेक्षित नव्हती. कारण मुलांपासून दूर राहणं हे कोणताही बाबा आनंदानं करत नाही. तो नाईलाजास्तव किंवा आजच्या काळाची ती गरज आहे, असं आपण म्हणू शकतो. बाबा मुलांपासून दूर असला तरी त्याचं प्रेम, माया मात्र तेवढीच उत्कट असते.

'दमलेल्या बाबाची...' या गीताला अफाट लोकप्रियता मिळाली. हे गाणं कसं सुचलं, असं अनेकदा विचारला जायचा. माझ्या आणि सलीलच्या बाबतीत या गाण्यातील अनुभव अनेकदा येत असे. परिस्थितीच अशी असायची की कार्यक्रमाच्या निमित्ताने बऱ्याच वेळा पहाटेच घरी यायला व्हायचं. त्यावेळी मुलं झोपलेली असायची. आम्ही सकाळी उठायचो तेव्ही ती शाळेत गेलेली असायची. कितीतरी वेळा त्यांच्याशी बोलणंच व्हायचं नाही. अशा वेळी मनात विचार सुरू असायचे. हे विचार कागदावर उतरवले गेले. एक कवी आणि एक संगीतकार अशा दोन बाबांच्या अनुभवातला आणि अनेकांच्या मनातला असा



तिच्या बोबड्या शब्दातून व्यक्त होऊ लागली. मग आमची जवळीक अधिक वाढत गेली. तिला गोष्टी सांगणं, तिच्या बोबड्या बोलात संवाद साधणं या गोष्टी आपोआपच होत गेल्या.

खरं मुलांमध्ये रमणं हे खूप आनंददायी असतं. कारण त्यांच्या कल्पना या अतिशय फ्रेश असतात. त्यांच्या भन्नाट कल्पनांचं मला मोठं कौतुक वाटतं. आपणही एकेकाळी लहान असताना असा विचार करत असतो; पण काळानुसार आपल्या विचारांमध्ये व्यवहारीपणा अधिक यायला लागतो. मुलांमध्ये हा व्यवहार नसतो. आपल्यातला फ्रेशनेस आपण वयानुसार हरवतो. माझ्यातल्या कलाकाराला ही खूप प्रकर्षाने जाणवली. रुमानी एखाद्या वेळेला इतकं अकल्पित वाक्य बोलून जाते की तिच्या कल्पनाशक्तीची मनापासून दाद द्यावीशी वाटते.

मागे एकदा माझी आणि सोनियाची मुलाखत सुरू होती. त्यावेळी रुमानीदेखील आमच्यासोबत बसली होती. थोड्या वेळाने तिने पाठ वळवली आणि प्रेक्षकांकडे बघू लागली. आम्ही तिला विचारलं, रुमा कंटाळलीस का?' तर ती म्हणाली, 'मी नाही कंटाळलेले. माझी पाठ कंटाळली.' म्हणून मी तिला बघण्यासाठी पुढं केलं. असाच एक गंमतीशीर प्रसंग आहे. एकदा सोनिया रुमाला नाईट गाऊन घालून खाली फिरायला घेऊन गेली होती. त्यावेळी रुमा चटकन म्हणाली, 'आई, मी नाईट गाऊन घालून फिरायला आले म्हणून लोकांना खूप लाज वाटत असेल नाही.'

हा गाण्याचा जन्म आहे. ही कविता सलग लिहिली गेली. मनात विचार सुरूच होते आणि अनुभव मनामध्ये रुजलेले होते. त्याला शब्दांमध्ये बसवलं जातं. काही कविता सहअनुभूतीतून येतात त्यावेळी कधीतरी चार ओळी आठवतात. पुढच्या ओळी पुढे कधी सुचतील ते सांगता येत नाही. या कवितेच्या बाबतीत मात्र तसं झालं नाही. लिहायला बसल्यावर ती पूर्णच झाली. किंबहुना, त्याशिवाय उठावेसेच वाटलं नाही.

'आयुष्यावर बोलू काही'च्या ५०० व्या प्रयोगात आम्ही ही कविता पहिल्यांदा सादर केली. तो एक प्रयोगच होता; परंतु आमचा प्रयत्न प्रामाणिक असल्यामुळे प्रेक्षकांची दाद मिळाली. हे गाणं ऐकताना अनेकांच्या डोळ्यांना रुमाल लागतात. या गाण्याला पत्र, फोन आणि प्रत्यक्ष भेटून लोकांनी दिलेल्या प्रतिक्रिया हेलावून टाकणाऱ्या आहेत. यामध्ये चार वर्षांच्या मुलांपासून आजीबाईंपर्यंत सर्वांच्या प्रतिक्रिया आहेत. याचं कारण ही 'दमलेल्या बाबाची कहाणी' प्रत्येकाच्या घरातली आहे.

'फादर्स डे' निमित्त मी मुलांना एवढेच सांगू इच्छितो की एखाद्याचे बाबा कामानिमित्त बाहेर असतील तर त्यांना आवर्जून या दिवशी फोन करा. तुमच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहोचवा. त्यांचं प्रेम आणि त्यांची माया ते दूर असले तरीही तुम्हाला नक्कीच जाणवेल.

**(शब्दांकन : प्राची जोशी)**

***वातानुकुलित यंत्रांमुळे विजेच्या मागणीवर वाढणारा दबाव आणि पर्यावरणाची होणारी हानी विचारात घेऊन केंद्र सरकार लवकरच नवी नियमावली जाहीर करणार आहे. यांनुसार, बाजारात येणाऱ्या सर्व नव्या एअर कंडिशनरमध्ये तापमान २० डिग्री सेल्सियसपेक्षा कमी करण्याची आणि २८ डिग्री सेल्सियसपेक्षा अधिक ठेवण्याची सुविधाच असणार नाही. म्हणजेच, वापरकर्त्याला केवळ या मर्यादित तापमानाच्या श्रेणीमध्येच वातानुकूलन करता येईल. या नियमानुसार, सार्वजनिक इमारती, कार्यालये, मॉल्स, हॉटेल्स, शासकीय सविभाग, वाहने आणि भविष्यात घरगुती उपकरणेसुद्धा या मर्यादेत येतील. ही नवी नियमावली काटेकोरपणे अंमलात आणली गेली, तर २०३५ पर्यंत विजेच्या कमाल मागणीत ६० गीगावॅटपर्यंत बचत होऊ शकते. तसेच नवीन वीज प्रकल्प आणि ग्रिडसाठीच अंदाजे ८८ अब्ज डॉलर्स इतक्या गुंतवणुकीची गरजही टळू शकते.***

# 'दोन अंश पर्यावरणासाठी...

**रविवार विशेष**

भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात उन्हाळ्याचे दिवस म्हणजे जणू सजीव सृष्टीसाठी एक परीक्षा असते. ४० ते ४५ अंश सेल्सियसच्या तापमानात श्वास घेणेसुद्धा कठीण होते. या उष्णतेपासून संरक्षणासाठी एअर कंडिशनरचा (वातानुकूलक) वापर करण्याचे प्रमाण गेल्या दोन दशकांमध्ये वाढले आहे. तथापि, एसींचा अनियंत्रित वापर हा निसर्गासाठी गंभीर संकट निर्माण करणारा आहे. त्यामुळे पर्यावरणतज्ज्ञांकडून एसीचा वापर कमी करण्याबाबत सातत्याने जनप्रबोधन केले जाते.



आता केंद्र सरकारकडून एसीच्या तापमानावर मर्यादा घालण्यासाठी काही मानके ठरवण्यात येणार आहेत. हा निर्णय पर्यावरणीय, सामाजिक व आरोग्यदृष्ट्याही दूरगामी परिणाम घडवणारा निर्णय आहे.

**नवा नियम काय सांगतो?**

सध्या विचाराधीन असणाऱ्या या प्रस्तावातील नियमांनुसार, बाजारात येणाऱ्या सर्व नव्या एअर कंडिशनरमध्ये तापमान २० डिग्री सेल्सियसपेक्षा कमी करण्याची आणि २८ डिग्री सेल्सियसपेक्षा अधिक ठेवण्याची सुविधाच असणार नाहीये. म्हणजेच, वापरकर्त्याला केवळ या मर्यादित तापमानाच्या श्रेणीमध्येच वातानुकूलन करता येईल. या नियमानुसार, सार्वजनिक इमारती, कार्यालये, मॉल्स, हॉटेल्स, शासकीय विभाग, वाहने आणि भविष्यात घरगुती उपकरणेसुद्धा या मर्यादेत येतील. आजघडीला घरातील जुन्या एसींसाठी सध्या नियम बंधनकारक नसला तरी येणाऱ्या काळात त्यावरही धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊ शकतो.

## इतर देश काय करतात?

भारत सरकारचा निर्णय आंतरराष्ट्रीय निकषांनुसार अगदी योग्य दिशेने आहे. जपानमध्ये सरकारी इमारतींमध्ये २६ डिग्री सेल्सियस, तर इटली, स्पेनसारख्या पश्चिम युरोपियन देशांमध्ये २३ ते २७ डिग्री सेल्सियसची मर्यादा बंधनकारक आहे. दक्षिण कोरियासारख्या देशांनीही यासंबंधी स्पष्ट नियम लागू केले आहेत. याचाच अर्थ हा निर्णय एकट्या पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून नाही, तर राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेचा भाग म्हणूनही महत्त्वाचा आहे.

**ही गरज का निर्माण झाली?**

✔ **ऊर्जेचा अपव्यय** : गेल्या काही वर्षांत देशात वातानुकूलन यंत्रांचा वापर प्रचंड वाढला आहे. एसीच्या अतिवापरामुळे उन्हाळ्यात विजेची मागणी अक्षरशः गगनाला भिडते. एका आकडेवारीनुसार, एक एसी सरासरी १.५ ते २ युनिट वीज प्रति तास वापरतो. याचाच अर्थ हे उपकरण सतत चालू ठेवणे म्हणजे हजारो कोटी युनिट वीजेचा अपव्यय.

✔ **कार्बन उत्सर्जनाचा धोका** : भारतात बहुसंख्य वीजनिर्मिती अजूनही कोळसा, डिझेल व नैसर्गिक वायू या जीवाश्म इंधनांवर आधारित आहे. अशा स्थितीत विजेचा वापर वाढवणे म्हणजे जीवाश्म इंधनाच्या ज्वलनाला गती देणे होय. यामुळे तापमान खाली आणण्यासाठी वापरले जाणारे एसी प्रत्यक्षात वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायू वाढवत असून ते हवामान बदलाचे मूळ कारण ठरते.

✔ **आरोग्याला धोका** : तज्ज्ञांच्या मते, २० डिग्री सेल्सियसपेक्षा कमी तापमान हे सर्दी, खोकला, श्वसनाचे त्रास, सांधेदुखी, त्वचेचे विकार आणि शरीरातील उष्णतेच्या संतुलनाचा बिघाड यांसारख्या अनेक आरोग्यविषयक समस्या निर्माण करू शकते. विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि आजारी व्यक्तींसाठी हे अत्यंत हानिकारक ठरते.

✔ **सामाजिक विषमता** : शहरांतील उच्चभ्रू वर्ग, अतिश्रीमंत वर्ग हा एसीचा आनंद लुटत ऐन उन्हाळ्यातही गारठ्याचा अनुभव घेत असतो; मात्र त्याच वेळी ग्रामीण भाग किंवा शहरी झोपडपट्ट्यांतील लोक उकाड्याचा सामना करतात. ही बाब सामाजिक विषमता, ऊर्जाविषमता वाढवणारी आहे. त्यादृष्टीनेही या निर्णयाकडे पाहिले जात आहे.

**फायदे काय होतील?**

**विजेची बचत** : सरकारच्या अंदाजानुसार, जर सर्व एसी २४ डिग्री सेल्सियसच्या आसपासच ठेवले गेले, तर दरवर्षी सुमारे २४० कोटी युनिट वीज वाचवता येईल. याचा अर्थ हजारो कोटींचा वीजखर्च कमी होईल, आणि त्यामुळे ऊर्जा क्षेत्रातील ताण कमी होईल. ब्लूमबर्गच्या एका अहवालानुसार, एसीच्या तापमानात केवळ १ अंश सेल्सियस वाढ केली, तर विजेची खपत सुमारे ६ टक्क्यांनी घटते. जर देशभरातील नागरिकांनी एकत्रितपणे आपले एसी फक्त १ अंश जास्त तापमानावर चालवले, तर पीक अवर्समध्ये (सर्वाधिक वीज वापराच्या काळात) सुमारे ३ गीगावॅट वीज वाचवता येईल. ही बचत अनेक शहरांच्या एकूण वीज मागणीइतकी आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कलेच्या एका अभ्यासानुसार, भारतात जर ही नवी नियमावली काटेकोरपणे अंमलात आणली गेली, तर २०३५ पर्यंत विजेच्या कमाल मागणीत ६० गीगावॅटपर्यंत बचत होऊ शकते. ही आकडेवारी केवळ वीजबचतीपुरती मर्यादित नाही, तर यामुळे नवीन वीज प्रकल्प आणि ग्रिडसाठी आवश्यक ७.५ ट्रिलियन रुपयांपर्यंत ( ८८ अब्ज डॉलर्स) इतक्या गुंतवणुकीची गरजही टळू शकते. या आर्थिक बचतीचा उपयोग आरोग्य, शिक्षण, जलव्यवस्थापन किंवा आवश्यक क्षेत्रांत होऊ शकतो.



■ रंगनाथ कोकणे
पर्यावरण अभ्यासक

**पर्यावरणस्नेही विकास** : कार्बन उत्सर्जन कमी झाल्यास हवामान बदलाचे परिणाम काही प्रमाणात नियंत्रित करता येतील. भारताने २०७० पर्यंत नेट झिरो कार्बन उत्सर्जन साध्य करण्याचा संकल्प केला आहे. या दिशेने हे एक सकारात्मक पाऊल आहे.

**आरोग्य लाभ** : वातानुकूलित वातावरणात राहणे म्हणजे एक प्रकारचा कृत्रिम हवामान अनुभव. अति थंड वातावरणाने शरीराच्या नैसर्गिक उष्मता संतुलनात बिघाड होतो. २४ ते २६ डिग्री सेल्सियस हा आदर्श तापमान मापदंड असल्याचे जागतिक आरोग्य संघटना सांगते.

**आर्थिक फायदा** : मध्यमवर्गीयांसाठी हा निर्णय वीज बिल कमी होण्याचा एक मार्ग ठरेल. कमी तापमानासाठी एसीला अधिक ऊर्जा लागते, त्यामुळे तापमानाचे नियंत्रण म्हणजे सरळ सरळ बिलात बचत.

## अंमलबजावणीतील अडथळे

कोणतेही धोरण किंवा नियम यशस्वी होण्यासाठी त्याची अंमलबजावणी सक्षम असावी लागते. याअनुषंगाने सरकारकडून पुढील गोष्टींची गरज आहे: एसी उत्पादक कंपन्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे व तांत्रिक निर्देश स्पष्टपणे जारी करणे, बाजारात जुन्या यंत्रांची विक्री रोखणे किंवा कालांतराने त्यांच्या वापरावर नियंत्रण आणणे, जनजागृती मोहिमा राबवून लोकांना पर्यावरणपूरक वापराचे महत्त्व समजवणे आणि सरकारी व खासगी कार्यालयांमध्ये ऊर्जा-प्रभावी धोरणांचे सक्तीने पालन करणे या गोष्टी प्राधान्याने केल्या गेल्या पाहिजेत. एसीचा योग्य वापर हा केवळ सरकारच्या धोरणांवर अवलंबून नाही. प्रत्येक नागरिकाने स्वतःहून ऊर्जा बचतीच्या सवयी अंगीकारणे आवश्यक आहे.
तापमानाच्या या मर्यादेमुळे भारत ऊर्जा बचत, पर्यावरण रक्षण, आरोग्य आणि आर्थिक संतुलन यामध्ये महत्त्वाचे यश साधू शकतो.

# कॅमेरा इथे, डेटा तिथे!

***तुमच्या घरावर, दुकानावर किंवा ऑफिसवर लावलेला सीसीटीव्ही कॅमेरा सुरक्षिततेसाठी असला, तरी त्या माध्यमातून तुमच्यावर कुणीतरी लक्ष ठेवत असण्याची शक्यता आहे. याचे कारण भारतात अनेक ठिकाणी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे थेट चीनमधील सर्व्हरला जोडले गेलेले आहेत आणि हीच बाब देशाच्या सुरक्षेसाठी मोठा धोका ठरली आहे. चीनमधील हिकव्हिजन, दहुआ यांसारख्या कंपन्यांचे कॅमेरे सहजपणे डेटा गोळा करून बाह्य सर्व्हरवर प्रसारित करू शकतात आणि त्यांचा थेट संबंध चीन सरकारशी आहे. त्यामुळे त्यांच्या माध्यमातून भारताच्या अंतर्गत हालचाली आणि संवेदनशील माहिती चीनला पोहोचण्याचा धोका आहे. यातून मिळणाऱ्या डेटाचा वापर गुप्तहेरगिरी आणि माहिती युद्धात केला जातो.***




एकविसाव्या शतकात संरक्षण आणि गुप्तचर तंत्रज्ञान हे केवळ रणांगणापुरते मर्यादित न राहता सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातही शिरकाव करत आहे. यामध्ये सुरक्षा कॅमेरे विशेषतः सीसीटीव्ही – महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारतात विविध ठिकाणी बसवण्यात येणारे हजारो कॅमेरे हे चीनमध्ये उत्पादित असल्याची बाब गंभीर चिंतेचा विषय बनली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये भारतात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. किंबहुना, सुरक्षेसंदर्भातील उपाययोजनांचा विषय निघाला की सीसीटीव्ही बसवण्याचा मुद्दा जणू हुकमी एक्का म्हणून वापरला जातो. पण यामुळे मिळणाऱ्या सुरक्षेची दुसरी बाजू फारशी विचारात घेतली जात नाही. ती आहे हेरगिरीची आणि आपल्या सर्व हालचालींवर अदृश्य शक्तींकडून ठेवल्या जाणाऱ्या पाळतीची.



व्हिडीओ सर्व्हिलन्स व्यवसायात हिकव्हिजन किंवा डाहुआ या दोन चिनी कंपन्यांचे वर्चस्व आहे. आयडीसी या बाजार संशोधन संस्थेच्या ताज्या आकडेवारीनुसार, अंदाजे ३५ अब्ज डॉलर्सच्या व्हिडीओ सर्व्हिलन्स उपकरणांच्या जागतिक बाजारात एक तृतीयांश हिस्सा हिकव्हिजन आणि डाहुआ या दोन कंपन्यांचा आहे. या दोन्ही महाकाय कंपन्यांचे उपकरणे जगभरातील विमानतळे, रेल्वे स्थानके आणि अगदी सरकारी इमारतींमध्ये लावले गेले आहेत.भारत सरकारने सर्व सीसीटीव्ही व अन्य सुरक्षा कॅमेऱ्यांचे तपासणी करण्यासाठी नवीन आणि अधिक कठोर नियम लागू केले आहेत. यामागे चीनकडून होणाऱ्या गुप्तहेरगिरीच्या संभाव्य धोक्याचा उल्लेख करण्यात आला आहे. नवीन नियमांनुसार, कॅमेरा उत्पादक कंपन्यांना त्यांचे हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि सोर्स कोड सरकारी प्रयोगशाळांमध्ये चाचणीसाठी सादर करावे लागतील. ही माहिती सरकारी दस्तऐवजांमधून आणि कंपन्यांच्या ईमेल संवादातून समोर आली आहे. सुरक्षेसंबंधी उपकरणे बनवणाऱ्या जागतिक कंपन्या आणि भारत सरकार यांत गेल्या काही आठवड्यांमध्ये या सुरक्षाविषयक नव्या धोरणांवरून मतभेद झाले आहेत, कारण या नव्या नियमांमुळे पुरवठा साखळी (सप्लाय चेन) मध्ये अडथळे येऊ शकतात. त्यामुळे मोदी सरकार व परदेशी कंपन्यांमधील आधीपासूनचे धोरणात्मक मतभेद अधिक तीव्र होऊ शकतात.

एप्रिलपासून लागू करण्यात आलेल्या नवीन धोरणातील नियमांनुसार, चीनच्या हिकव्हिजन, श्याओमी आणि डाहुआ, दक्षिण कोरियाच्या हानवा आणि अमेरिकेच्या मोटोरोला सोल्युशन्स यांसारख्या कंपन्यांना त्यांचे कॅमेरे भारतात विकण्यापूर्वी भारतीय सरकारी प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी सादर करावे लागतील. हे नियम ९ एप्रिलपासून सर्व इंटरनेटशी जोडलेल्या सीसीटीव्ही मॉडेल्सवर लागू करण्यात आले आहेत.

सायबरसुरक्षा तज्ज्ञांच्या मते, गुप्तहेरगिरीचा धोका कायम असतो. कोणतेही इंटरनेटशी जोडलेले कॅमेरे दूरवरून नियंत्रित करता येतात. त्यामुळे ही सिस्टीम मजबूत व सुरक्षित असणे आवश्यक आहे. दोन महिन्यांपूर्वी भारतीय अधिकाऱ्यांनी १७ देशी आणि परदेशी कॅमेरा उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींशी बैठक घेतली होती. बहुतेक कंपन्यांनी या बैठकीत सांगितले की, त्या या नियमांची पूर्तता करण्यास अद्याप तयार नाहीत आणि त्यांना यासाठी अतिरिक्त वेळ हवा आहे; मात्र सरकारने ही मागणी फेटाळून लावली. सरकारच्या अधिकृत नोंदीत नमूद करण्यात आले आहे की, ही धोरणात्मक आवश्यकता राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहे आणि त्यामुळे त्याची अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

डिसेंबर महिन्यात भारत सरकारने स्पष्ट केले होते की हे नियम कोणत्याही विशिष्ट देशासाठी नाहीत, तर देशात सुरक्षाव्यवस्था व सायबर सुरक्षेची गुणवत्ता वाढवण्यासाठी ही पावले उचलण्यात आली आहेत. गेल्या वर्षी एका अहवालात म्हटले होते की एका चिनी कंपनीने भारत सरकारचीच गुप्तहेरगिरी केली होती.

गेल्या काही वर्षांत भारतातील शहरांमध्ये, कार्यालयांमध्ये आणि निवासी संकुलांमध्ये लाखो सीसीटीव्ही कॅमेरे बसवले गेले आहेत. सरकारी आकडेवारीनुसार, फक्त दिल्ली शहरातच २.१५ लाखांहून अधिक कॅमेरे बसवले गेले आहेत.



■ महेश कोळी
संगणक अभियंता

**सात अब्ज डॉलर्सचा बाजार**

काउंटरपॉइंट रिसर्च या संस्थेच्या म्हणण्यानुसार, भारतातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची बाजारपेठ २०३० पर्यंत ७ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. गेल्या वर्षी हा आकडा ३.१५ अब्ज डॉलर्स इतका होता. आता या बाजारात चीनच्या हिकव्हिजन आणि डाहुआचा ३० टक्के हिस्सा आहे, तर भारतीय कंपनी सीपी प्लसचा ४८ टक्के हिस्सा आहे. मात्र ८० टक्क्यांहून अधिक घटक उपकरणे चीनमधून आयात केली जातात. कंपन्यांचे म्हणणे आहे की, तपासणी व नवीन नियमांमुळे त्यांच्या अनेक उत्पादनांना अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

## सरकारी संस्थांमध्ये चिनी कंपन्यांचे १० लाख कॅमेरे

भारताची ही भूमिका मुख्यत्वे चीनच्या प्रगत निगराणी क्षमतांमुळे घेतली गेली आहे. एका अंदाजानुसार, आजघडीला सरकारी संस्थांमध्ये एकूण १० लाखांहून अधिक कॅमेरे चिनी कंपन्यांचे आहेत आणि यांच्याशी संबंधित माहिती विदेशी सर्व्हरवर पाठवली जात आहे. साहजिकच ही बाब राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आहे. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे वैशिष्ट्य असे की, यामधील सर्व डेटा थेट क्लाउडवर अपलोड होतो. अनेक वेळा चिनी सर्व्हरवर डेटा पोहचतो, आणि तो व्हिडीओ नंतर मनाप्रमाणे एडिट करणे किंवा फेक व्हिडीओ तयार करणे शक्य होते. त्यामुळे हे केवळ निरीक्षणाचे माध्यम राहत नाही, तर त्याचा वापर गुप्तहेरगिरी आणि माहिती युद्धात केला जातो.

■ सीसीटीव्ही उपकरणांच्या तपासणीची जबाबदारी आयटी मंत्रालयाच्या स्टँडर्डायझेशन टेस्टिंग अँण्ड क्वालिटी सर्टिफिकेशन डायरेक्टोरेट (एसटीक्यूसी) कडे आहे. त्यांच्याकडे १५ प्रयोगशाळा आहेत ज्या एकाच वेळी २८ अर्जांची तपासणी करू शकतात. प्रत्येक अर्जात १० मॉडेल्सची चाचणी केली जाऊ शकते.
■ काउंटरपॉइंटनुसार, सार्वजनिक क्षेत्रातील मागणी फक्त २७ टक्के आहे, तर उर्वरित ७३ टक्के मागणी उद्योग, हॉटेल्स व घरांकडून आहे. चिनी कॅमेरे केवळ शासकीय वापरापुरतेच मर्यादित नाहीत, तर खासगी कंपन्या, दुकाने, गृहनिर्माण संस्था सुद्धा मोठ्या प्रमाणात हे उपकरणे वापरतात. त्यामुळे साधा नागरिकही सायबर हेरगिरीचा बळी ठरू शकतो. हिकव्हिजन, डाहुआ आणि सीपी प्लसचे कॅमेरे अजूनही विक्रीस उपलब्ध आहेत.

चीनच्या कॅमेऱ्यांची चिंता केवळ भारतीय कंपन्यांनाच नाहीये; २०२३ मध्ये ब्रिटननेही तेथील चीनी कॅमेरे हटवण्याचा निर्णय घेतला होता. २०२२ मध्ये अमेरिकेने हिकव्हिजन आणि डाहुआवर राष्ट्रीय सुरक्षेला धोका असल्याचे सांगत बंदी घातली होती. ऑस्ट्रेलियानेही अशा चिनी उपकरणांवर निर्बंध घातले आहेत. जर्मनीने गेल्या वर्षी चीनच्या ५जी डिव्हाइसेस पुरवणाऱ्या कंपन्यांवर बंदी घातली होती. या पार्श्वभूमीवर आपल्याला पाहावे लागेल की या उपकरणांमध्ये नक्की काय वापरले गेले आहे, कोणते चिप्स वापरले गेले आहेत.

चीनचा राष्ट्रीय सुरक्षा कायदा तिथल्या कंपन्यांना गुप्तचर कामात सहकार्य करण्यास बाध्य करतो. मे महिन्यात रॉयटर्सने अहवाल दिला होता की काही चिनी सोलर इन्व्हर्टरमध्ये संशयास्पद संवाद उपकरणे आढळली होती. २०२० मध्ये भारत-चीन सीमेवरील संघर्षानंतर भारताने टिकटॉकसह अनेक चिनी ॲप्सवर बंदी घातली होती आणि विदेशी गुंतवणूक धोरण अधिक कठोर केले होते. गेल्या वर्षी लेबनॉनमध्ये पेजरमध्ये दूरस्थ स्फोट घडवण्याच्या घटनेने भारतातही तंत्रज्ञानाच्या गैरवापराची भीती वाढवली आहे. जरी या नवीन नियमांमध्ये चीनसह सीमा सामायिक करणाऱ्या देशांचा स्पष्ट उल्लेख नसला तरी श्याओमीने एप्रिलमध्ये नमूद केले की, जेव्हा त्यांनी सीसीटीव्ही डिव्हाईसच्या चाचणीसाठी अर्ज केला, तेव्हा त्यांना चीनस्थित दोन कंत्राटी उत्पादकांची माहिती द्यावी लागली.

भारतात सार्वजनिक आणि खाजगी संस्थांमध्ये लावले जाणारे १० पैकी ८ कॅमेरे चिनी बनावटीचे आहेत. सीसीटीव्ही तंत्रज्ञान हे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असले, तरी चीनसारख्या देशांकडून येणाऱ्या उपकरणांची अंधपणे खरेदी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी दीर्घकालीन धोका बनू शकते. यासाठी सजग धोरणे, स्थानिक उत्पादनांचा वापर, आणि नागरिकांमध्ये सायबर सुरक्षा जागरूकता वाढवणे हे काळाची गरज आहे. फक्त आर्थिक कारणांसाठी परकीय, विशेषतः शत्रुत्व ठेवणाऱ्या देशांचे उत्पादन स्वीकारणे, हे भविष्यात मोठी किंमत मोजणारे ठरू शकते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# रक्तदान श्रेष्ठ पण व्यवस्थापन कनिष्ठ

आरोग्यव्यवस्थेत वेगाने आधुनिकता येते आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातून लागलेले नवनवीन शोध अनेक अवघड शस्त्रक्रियादेखील सुसाध्य केल्या आहेत. म्हणजे एकीकडे साधनसामुग्रीची उपलब्धता आणि तंत्रज्ञानाने त्यात आणलेली सहजता आरोग्य किंवा वैद्यकीय क्षेत्रासाठी वरदान ठरलेली आहे. स्वाभाविकपणे अनेक प्रकारच्या व्याधी किंवा आजारांवरचे उपचार करता येतात. उपचारांमध्येच आवश्यक असणारा रक्तपुरवठा आणि त्याचे संकलन संवर्धन करण्याचे नवे तंत्र उपयुक्त ठरते आहे. नुकताच जागतिक रक्तदान दिवस साजरा झाला. रक्तदानाचे महत्त्व सांगितले गेले. रक्तदानाची आवश्यकता किंवा अनिवार्यता काय आहे हे आता वेगळ्या पद्धतीने सांगण्याची आवश्यकता उरलेली नाही. अनेक दुर्धर व्याधींसाठी वेगवेगळ्या गटाचे रक्त आवश्यक असते. विशेषतः मोठ्या शस्त्रक्रिया करीत असताना रुग्णाला सतत रक्तपुरवठा होणे आवश्यक असते. अशावेळी रुग्णांच्या नातेवाईकांकडून किंवा बाहेरच्या रक्तपेढ्यांमधून रक्त मागवले जाते. ऐनवेळेला तातडीच्या उपचारांमध्ये केव्हाही रक्ताची गरज पडू शकते. म्हणून अनेक रुग्णालयांमध्ये तातडीची व्यवस्था म्हणून रक्तसाठा तयारही ठेवलेला असतो. विशेषतः भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशात अपघातांचे प्रमाण प्रचंड आहे. आणि यात जखमी होणाऱ्या म्हणजेच अपघातग्रस्तांना तातडीने रक्तपुरवठा करावा लागतो. तो वेळच्यावेळी उपलब्ध होणे तितकेच आवश्यक ठरते. अनेकवेळेला तसा तो उपलब्ध होत नाही. आणि वेळेवर रक्त उपलब्ध न झाल्याने एकूण देशभरामध्ये जवळपास पंधरा टक्के लोकांना जीव गमवावा लागतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्याकडे रक्तसंकलनाचे किंवा रक्तदानाचे आकर्षण आहे. परंतु रक्तसंकलनाचे व्यवस्थापन नाही. यातला वेगवेगळ्या प्रकारचा विरोधाभास जर लक्षात घेतला तर आरोग्य किंवा वैद्यकीय उपचारांमध्ये अत्यंत महत्त्वाचा ठरणारा हा घटक उपचारापुरताच लक्षात घेतला जातो. त्याचे पूर्वनियोजित संकलन आणि योग्यवेळी योग्य ठिकाणी संयोजनही तितकेच गरजेचे ठरते. दुर्दैवाने आज या संदर्भात कोणतेही काटेकोर किंवा आधुनिक व्यवस्थापन नसल्याने अनेक ठिकाणी रक्ताचा तुटवडा निर्माण होण्यापासून ते ज्यादा झालेले रक्त टाकून देण्यापर्यंतचा प्रकार पाहायला मिळतो.

**महाराष्ट्राचे उदाहरण**

अगदी महाराष्ट्राचे जरी उदाहरण घेतले तरी खूपच विपरित परिस्थिती पाहायला मिळते. राज्यात आज हजारो रक्तपेढ्या आहेत. त्यांच्याकडून अक्षरशः हजारो लीटर रक्ताचे संकलनही होत असते. परंतु त्याच्या योग्य पद्धतीने संवर्धन करण्याच्या सोयीसुविधा पाहायला मिळत नाहीत. रक्तपेढी कोणी सुरू करावी, त्याच्यासाठी कोणत्या गोष्टींची पात्रता किंवा निकष आवश्यक आहे. संकलन होणाऱ्या रक्ताचे कशा पद्धतीने संरक्षण केले जाणार आहे त्यासाठी आवश्यक साधनसामुग्री प्रशिक्षित कर्मचारी वर्ग या साऱ्या गोष्टींची आवश्यकता असते. अनेक रक्तपेढ्यांबाबत फारसे उत्साहवर्धक चित्र पाहायला मिळत नाही. संकलित केलेले रक्त किती काळ ठेवायचे याबद्दलही खूप संभ्रम असल्याचे सांगितले जाते. त्यातले काही घटक काढून घेतल्यानंतर उरणारे रक्त वापरण्याची प्रक्रिया किंवा काढलेल्या घटकांचाही वेगवेगळ्या व्याधी किंवा रोगांसाठी होणारा उपयोग याबद्दलदेखील खूप जनजागृती होण्याची आवश्यकता आहे. अगदी गेल्या काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारकडून नव्याने काही पन्नास संस्थांना रक्तसंकलनाची परवानगी दिली गेली. परंतु आज महाराष्ट्रात भरपूर रक्तपेढ्या आहेत त्यांच्याकडे असलेल्या रक्ताचा पुरेपूर वापर होत नसल्याच्याही तक्रारी येतात. आणि बरेचसे रक्त वाया जाण्याच्या घटनाही घडतात. कारण रक्तदान हे श्रेष्ठदान असे म्हणत उत्साहाच्या भरात संकलन मोठ्या प्रमाणावर होते. आणि यासाठी कुठलेही निमित्त पुरते. मग अनेक संस्थांचा वर्धापन दिन असला काय किंवा नेत्यांचे वाढदिवस असले काय यानिमित्ताने रक्तदान शिबीरे आयोजित होतात. कार्यकर्ते हजारोच्या संख्येने या उपक्रमात सहभागी होतात. एकाचवेळी अचानकपणे तयार होणारा हा रक्तसाठा ठेवायचा कसा कारण त्यासाठी लागणारी यंत्रसामुग्रीही अनेकांकडे नसते. विशेष म्हणजे रक्तदान करण्याच्या नियमावलीचेदेखील अनेक ठिकाणी पालन होत नाही. यासंदर्भात अनेक मोठ्या रुग्णालयांनीदेखील आपली नाराजी व्यक्त केली आहे. राजकीय दबावापोटी सरकारी रुग्णालयांमध्ये जमा होणारे हे रक्त जपून ठेवण्यात अनेक अडचणी येत असतात. ज्या रक्तदानाला श्रेष्ठदान म्हटले जाते. परंतु त्याचे अत्यंत कनिष्ठ व्यवस्थापन सर्वदूर पाहायला मिळते.

**महत्त्वपूर्ण घटकाकडे दुर्लक्ष**

एकूणच मानवी शरीरातला हा महत्त्वपूर्ण घटक एकाअर्थी दुर्मीळ असतो. प्रत्येक व्यक्तीच्या शरीरात साडेपाच ते सहा लीटरच रक्त असते. आणि प्रत्येक व्यक्ती एकावेळेला फक्त ३०० मिली रक्ताचे दान करू शकते. ते करण्यापूर्वी अनेक गोष्टींची खातरजमा अत्यंत महत्त्वाची ठरते. संबंधित व्यक्तीला कोणताही आजार असता कामा नये. किमान तीन महिने त्यांनी रक्तदान केलेले नसावे. थोडक्यात निर्दोष रक्त मिळावे आणि ते जपून ठेवणे सोपे जावे हा त्यामागचा उद्देश असतो. म्हणूनच या महत्त्वपूर्ण दुर्मीळ घटकाविषयी सातत्याने जनजागृती तर झाली पाहिजे, पण त्याही पेक्षा रक्तसंकलन आणि त्याचे संरक्षण संवर्धनासाठी उत्तम व्यवस्थापन शास्त्र विकसित केले पाहिजे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात खूप नवनवीन यंत्रांच्या माध्यमातून हे संवर्धन करता येणे शक्य आहे. याबरोबरच काही मिनिटांच्या आत रक्त उपलब्ध करून देण्याची ऑनलाईन व्यवस्थासुद्धा अस्तित्वात आली पाहिजे. अनेक वेळेला अगदी आणीबाणीच्या प्रसंगात रुग्णांच्या नातेवाईकांना रक्ताचा शोध घेत फिरावे लागते. ज्यातही ज्यांचा दुर्मीळ रक्तगट असतो. त्यांच्यासाठी मोठी कसोटीच असते. म्हणूनच या सगळ्या व्यवस्थापन शास्त्रात संगणकावरच्या एका क्लिकवर रक्तपुरवठ्यापासून ते रक्ताच्या संकलनसंवर्धनापर्यंतच्या व्यवस्था करता येऊ शकतात. काही प्रमाणात नवनवीन यंत्रसामुग्रींचा वापर होतो आहे. मोठमोठ्या औषध कंपन्यांकडून रक्तातले काढलेले घटक विकत घेतले जातात आणि ते वेगवेगळ्या प्रक्रियांमध्ये वापरलेही जातात. या सगळ्या गोष्टींसाठी शास्त्रशुद्ध अभ्यास गरजेचा ठरतो.

**सुविचार**

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**संगत नेहमी चांगल्या माणसांशी करा. कारण या जगात घडविणारे कमी आणि बिघडवणारे जास्त आहेत.**

**पंचांग**

रविवार, १५ जून, २०२५
शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर

ज्येष्ठ कृष्ण चतुर्थी
नक्षत्र : श्रवण



रवी उदय- ०६-०२
रवी अस्त- १९-१६

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मकर

सूर्य मिथुन सकाळी ६.४४, पुण्यकाळ सकाळी ६.४४ ते दुपारी १.०८, यादवराव महाराज पुण्यतिथी-धापेवाडा; जागतिक फादर्स डे

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

**पाककृती**



## बनाना कप केक

★ **साहित्य :-** पिकलेली केळी-दोन, रवा-एक कप, दही-दोन चमचे, रिफाईंड तेल-दोन चमचे, साखर-चवीनुसार, बेकिंग सोडा-एक चमचा, वेलची पूड-अर्धा चमचा, टुटी-फ्रुटी-एक चमचा

★ **कृती :-** सर्वात आधी पिकलेली केळी सोलून मॅश करा. आता एका भांड्यात रवा घ्या आणि त्यात दही घाला. तुम्हाला हवे असल्यास, रव्याऐवजी तुम्ही मैदा वापरू शकता. रवा आणि दह्याच्या या मिश्रणात रिफाईंड तेल घाला. तसेच तेलाऐवजी तुम्ही बटर किंवा देशी तूप वापरू शकता. तसेच आवश्यक प्रमाणात साखर घाला. आता दही, रवा आणि तेलाच्या या मिश्रणात वेलची पूड वापरा. आता चांगले फेटून घ्या. या मिश्रणात मॅश केलेले केळे घाला. चांगले फेटून त्यात टुटी-फ्रुटी घाला. नंतर हे मिश्रण १५ मिनिटे बाजूला ठेवा जेणेकरून रवा पूर्णपणे विरघळेल आणि मिसळेल. आता एका जाड तळाच्या पॅनमध्ये मीठ टाका आणि गॅसवर ठेवा. जेव्हा हे पॅन चांगले गरम होईल तेव्हा त्यात पॅनकेक साचा ठेवा. पॅन गरम होत असताना, मिश्रण केक साच्यात फिरवा. पण उलटण्यापूर्वी, त्यात बेकिंग सोडा मिसळा आणि चांगले फेटून घ्या. नंतर मिश्रण सर्व साच्यात ओता आणि ते सेट होऊ द्या. जर तुमच्याकडे साचा नसेल तर तुम्ही एक वाटी देखील वापरू शकता. नंतर हे सर्व साचे गरम पॅनमध्ये ठेवा आणि अर्ध्या तासासाठी मंद आचेवर वाफ येण्यासाठी सोडा. तर चला तयार आहे बनाना कप केक. यावर तुम्ही केळीचे छान बारीक कापने देखील सजवू शकतात.



# द.आफ्रिकेला २७ वर्षांनी आयसीसीचे विजेतेपद




■ लंडन

**इंग्लंडमधील** ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर दक्षिण आफ्रिका संघाने आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाला ५ विकेटनी पराभूत करून इतिहास रचला. या विजयासह टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिका संघाने २७ वर्षांनंतर आयसीसीचे विजेतेपद आपल्या नावावर केले आहे. यापूर्वी १९९८ मध्ये दक्षिण आफ्रिकेने आंतरराष्ट्रीय चषक जिंकला होता. मोठ्या सामन्यांमध्ये अपयशस्वी होण्यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट संघाला जागतिक क्रिकेटमध्ये चोकर्स म्हणून ओळखले जायचे. दक्षिण आफ्रिका संघाने शेवटचे आयसीसी स्पर्धेचे विजेतेपद विल्स इंटरनॅशनल कप (१९९८) मध्ये मिळवले होते. या संघाने जागतिक क्रिकेटमध्ये अनेकदा 'चोकर्स' असल्याचे सिद्ध केले होते.

## ३.६ मिलियन डॉलर मिळाले

दक्षिण आफ्रिकेच्या संघाला विजेतेपदासह ३.६ मिलियन डॉलर अंदाजे ३१ कोटी बक्षीसाची रक्कम जिंकली. मागच्या दोन पर्वातल्या विजेत्या संघाला १.६ मिलियन डॉलरचे बक्षीस देण्यात आले होते. दुसऱ्या बाजूला उपविजेता संघ असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या संघाला २.१६ मिलियन डॉलर म्हणजेच १८ कोटी, ४७ लाख, ५५ हजार, ६०० रुपये बक्षीसाची रक्कम मिळाली.

## स्मिथच्या बोटाला फ्रॅक्चर

फलंदाज स्टीव्ह स्मिथने टेम्बा बावुमाचा झेल सोडला. त्यावेळी स्मिथच्या बोटालाही दुखापत झाली. ज्यामुळे तो क्षेत्ररक्षण करू शकला नाही. त्यानंतर आज त्याच्या बोटाला फ्रॅक्चर झाल्याचे उघड झाले.

## काईल व्हेरियन खूप घाबरला होता

दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज व्हेरियन म्हणाला की, सध्या मला बरे वाटत आहे. मी सकाळपासून सामना पाहत होतो आणि विचार करत होतो की, मला कदाचित फलंदाजी करायला मिळणार नाही. जेव्हा मी क्रीजकडे चालत होतो तेव्हा मी खूप घाबरलो होतो. मला असे कधीच वाटले नव्हते. या विजयाचा खूप अर्थ आहे. मी थोडा भावनिक झालो आहे. हा एक अविश्वसनीय अनुभव आहे.

# भारताच्या सुरुची सिंगने नेमबाजीत जेतेपद पटकावले

■ म्युनिक



**भारताची** सुरुची सिंगने नामवंत नेमबाजांचा सहभाग असलेल्या आयएसएसएफ वर्ल्ड कपमध्ये सलग तिसरे सुवर्णपदक मिळवत महिलांच्या १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात जेतेपद पटकावले. तिची ही तिसरी वर्ल्डकप स्पर्धा असून, १९वर्षीय सुरुचीने सुवर्णपदकाची हॅट्ट्रिक तर एकंदर चौथे वैयक्तिक सुवर्ण मिळविले.

एप्रिलमध्ये ब्युनॉस एअर्स व लिमा येथे झालेल्या स्पर्धेतही तिने सुवर्ण मिळविले होते. तिने अंतिम फेरीत २४१.९ गुण नोंदवत पहिले स्थान पटकावले. कांस्य मिळविणाऱ्या चीनच्या कियाझुन याओला (२२१.७) मागे टाकत १०.५ गुणांची आघाडी घेतली तर रौप्य मिळविणाऱ्या फ्रान्सच्या कॅमिले जेद्रेजेवस्कीला (२४१.७ ) ९.५ गुण मिळविता आले. सुरुचीने शेवटच्या शॉटमध्ये ९.५ गुण नोंदवल्याने तिचे सुवर्णपदक निश्चित झाले.

# भारतीय संघाच्या अपुऱ्या सरावाबाबत गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्केलला चिंता

■ बेकनहॅम

**इंग्लंडविरुद्धच्या** बहुचर्चित पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात होण्यास केवळ आठवडाभराचा कालावधी शिल्लक असताना भारतीय संघाच्या अपुऱ्या सरावाविषयी गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मॉर्केलने चिंता व्यक्त केली. इंग्लंडमधील लहरी वातावरणात वेगवान गोलंदाजांना मदत मिळते. मात्र, परिस्थिती अनुकूल असताना वाहवत न जाणे आणि चेंडूवर नियंत्रण राखणे हेच गोलंदाजांसमोरील मोठे आव्हान असेल, असेही मॉर्केल म्हणाला.

भारतीय संघ सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर असून, २० जूनपासून पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मॉर्केल म्हणाला की, आमच्या काही खेळाडूंनी लाल चेंडूने फारसा सराव केलेला नाही. याची थोडी काळजी वाटत आहे.मात्र,इंग्लंडमध्ये दाखल झाल्यापासून तीन दिवसांत आमचे खेळाडू बरीच मेहनत घेत आहेत. त्यांच्यात आत्मविश्वास दिसून येत आहे.

# भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी इंग्लंड महिला संघ जाहीर

■ लंडन

**भारताविरूद्धच्या** ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी इंग्लंड महिला संघाची घोषणा इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने केली. याआधीच भारतीय महिला संघ जाहीर झाला होता. इंग्लंडच्या संघात स्टार अष्टपैलू सोफी एक्लेस्टोन पुन्हा परतली आहे. जी सध्या क्रिकेटपासून लांब होती.

वेगवान गोलंदाज लॉरेन फिलरलाही इंग्लंडच्या संघात संधी देण्यात आली आहे.तर लेग-स्पिनर सारा ग्लेनला मात्र बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. मागील महिन्यात वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेदरम्यान दुखापतग्रस्त झालेली हीथर नाईट देखील या मालिकेत दिसणार नाही.



सोफी एक्लेस्टोन सध्या आयसीसी महिला गोलंदाजी रँकिंगमध्ये पहिल्या क्रमांकावर विराजमान आहे. इंग्लंड महिला संघाच्या मुख्य प्रशिक्षक चार्लोट एडवर्ड्सकडून सोफी एक्लेस्टोनच्या संघात पुनरागमनाबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला आहे. त्या म्हणाल्या की, सोफीचे संघात पुनरागमन ही आपल्या सर्वांसाठी एक आनंदाची बाब आहे. ती आमच्या संघाची सामना जिंकून देणारी महत्त्वाची खेळाडू आहे.

**इंग्लंड महिला संघ**

नेट सायव्हर-ब्रंट (कर्णधार), एम आलॉट, टॅमी ब्यूमोंट, ॲलिस कॅप्सी, लॉरेन बेल चार्ली डीन, सोफिया डंकले, सोफी एक्लेस्टोन, लॉरेन फाइलर, एमी जोन्स, डॅनी व्याट-हॉज, पेज स्कोफिल्ड, लिन्से स्मिथ, इस्सी वोंग.

# मोहम्मद युसूफने दिला एनसीएच्या फलंदाजी प्रशिक्षकपदाचा राजीनामा

■ कराची

**पाकिस्तानचे** माजी फलंदाज मोहम्मद युसूफ यांनी राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या फलंदाजी प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्याबाबत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडून अद्याप कोणतीही माहिती दिली नाही. परंतु त्यांनी राजीनाम्याबद्दल सांगितले की, गेल्या आठवड्यातच बोर्डाने माझा राजीनामा स्वीकारला. राजीनामा देण्याचा निर्णय हा पूर्णपणे वैयक्तिक आहे. मोहम्मद युसूफ क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर कोचिंगमध्ये सक्रिय झाले. गेल्या अनेक वर्षांपासून ते एनसीएचे फलंदाजी प्रशिक्षक होते. त्यांनी केवळ अंडर-१९ संघासोबतच नव्हे तर पाकिस्तानच्या वरिष्ठ संघासोबतही फलंदाजी प्रशिक्षक म्हणून काम केले. त्यांच्या प्रशिक्षणादरम्यान पाकिस्तान संघाला अनेक चांगले फलंदाज मिळाले.



माजी वेगवान गोलंदाज आकिब जावेद यांना एनसीएचे संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले. या निर्णयावर युसूफ नाराज होते. त्यांची ज्येष्ठता बघितली तर त्यांना या पदावर बढती मिळायला हवी होती, असे मत युसूफ यांचे होते. या नाराजीमुळे त्यांनी राजीनामा सादर केल्याचे बोलले जात आहे. तो राजीनामा आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने देखील स्वीकारला.

# कोल्हापुरात ९ जुलैपासून जिल्हा बॅडमिंटन स्पर्धा

■ कोल्हापूर


**कोल्हापूर** जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनतर्फे ९ ते १३ जुलैदरम्यान अंबाई डिफेन्स कॉलनी हॉलमध्ये जिल्हा अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धा होणार आहे. या स्पर्धा १०, १३, १५, १७ आणि १९ वर्षांखालील मुले-मुली, एकेरी आणि १५, १७ आणि १९ वर्षांखालील मुले-मुली दुहेरी, पुरुष आणि महिला एकेरी, पुरुष दुहेरी, ३५ वर्षांवरील पुरुष दुहेरी, ५० वर्षांवरील पुरुष दुहेरी अशा विविध गटांत स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंनी ६ जुलैपर्यंत सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी सचिव तन्मय करमरकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनतर्फे केले.

# आशियाई जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या प्रणती नायकला कांस्यपदक

■ जेचियोन

**कोरियातील** जेचियोन येथे झालेल्या आशियाई आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिपच्या महिला या व्हॉल्ट स्पर्धेत भारताच्या प्रणती नायकने कांस्यपदक जिंकले. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत ३० वर्षीय प्रणती नायकने १३.४६६ गुणांसह तिसरे स्थान पटकावले. चीनच्या झांग यिहानने अव्वल आणि व्हिएतनामच्या न्गुयेन थी क्विन्ह न्हू याने दुसरे स्थान पटकाविले.

प्रणतीने पात्रता फेरीत १३.०८३ गुणांसह चौथे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. या विजयासह प्रणती आता आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सर्वाधिक पदके जिंकणारी भारतीय जिम्नॅस्ट बनली आहे. तिने २०१५च्या हिरोशिमामध्ये कांस्य आणि २०२४ च्या ताश्कंदमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या दीपा कर्माकरला मागे टाकले. यापूर्वी तिने उलानबातर (२०१९) आणि दोहा (२०२२) येथे महिलांच्या व्हॉल्ट स्पर्धेतही पोडियमवर स्थान मिळवले होते.






# ज्येष्ठ महिन्यात सुख समृद्धीसाठी हे करा...

**ज्येष्ठ महिना हा हिंदू कॅलेंडरचा तिसरा महिना आहे. या महिन्यात अनेक महत्त्वाचे सण आणि धार्मिक विधी साजरे केले जातात. वैशारव महिन्याची पौर्णिमा संपल्यानंतर ज्येष्ठ महिन्याची सुरुवात होते. कॅलेंडरनुसार, हा महिना सहसा मे आणि जूनमध्ये येतो. सध्या ज्येष्ठ महिना सुरू आहे तो २५ जून २०२५ रोजी संपेल. या महिन्याची रवास गोष्ट म्हणजे हा वर्षातील सर्वात मोठा महिना आहे. या महिन्यात कडाक्याची उष्णता असते. यामुळेच या महिन्याला सर्वात उष्ण महिना म्हटले जाते. धार्मिक महत्त्वाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर हिंदू धर्मात ज्येष्ठ महिन्याला विशेष महत्त्व आहे. ज्येष्ठ महिन्यात काही रवास देवतांची पूजा विधीपूर्वक केली जाते.**

ज्येष्ठ महिन्यात, भगवान विष्णु आणि सूर्य देवाची उपासना केली पाहिजे. या महिन्यात सूर्य वृषभ राशीत असतो. तसेच, ज्येष्ठ महिन्यात उष्णतादेखील खूप जास्त असते. अशा परिस्थितीत, भगवान विष्णूचा तीक्ष्ण सूर्य सूर्यामध्ये प्रवेश करतो आणि त्यास अधिक तीक्ष्ण करतो. हेच कारण आहे की ज्येष्ठ महिन्यात भगवान विष्णू आणि सूर्याची उपासना करणे हे विशेष महत्त्व आहे.


जर आपण या महिन्यात नियमितपणे विष्णू आणि सूर्याची उपासना केली तर भगवान विष्णू आणि सूर्य देव यातून खूश होईल. त्याची कृपा आपल्यावर राहते आणि जीवनात आनंद येतो. ज्येष्ठ महिन्यात, पाणी आणि सरबत दान करणे आवश्यक आहे.

या महिन्यात उष्णता जास्त असते. अशा परिस्थितीत, जर आपण गरजू आणि तहानलेल्या लोकांना पाणी आणि सरबत दिले तर आपल्याला खूप शुभ परिणाम मिळतील. तसेच, सूर्य देवदेखील या सेवेबद्दल खूष होतील आणि त्याचे विशेष आशीर्वादही प्राप्त होतील. असे मानले जाते की, ज्येष्ठ महिन्यात पाणी आणि सरबत दान करणे, तसेच देणगी देणे पुण्याचे मानले जाते. एखाद्या व्यक्तीस जीवनातील समस्यांपासून मुक्ती मिळू शकते.

ज्येष्ठ महिन्यात, शनीचा उद्रेक दूर करण्यासाठी ज्येष्ठ अमावास्याच्या दिवशी पिंपळाच्या झाडाची पूजा केली पाहिजे.

ज्येष्ठ अमावास्याच्या दिवशी देवतेच्या नावे देणगी देखील फायदेशीर आहे. हा उपाय करून, एखादी व्यक्ती शनीच्या क्रोधापासून मुक्त होऊ शकते आणि जीवनातील दुःख दूर होऊ लागते. आपल्या महत्त्वपूर्ण कामांमध्ये वारंवार व्यत्यय आला असेल तर हा उपाय केल्याने अडलेली कामे मार्गी लागण्यास सुरुवात होते. आणि जीवनात यशदेखील मिळू शकते.

ज्येष्ठ महिन्यात गरजू लोकांनी काकडी, टरबूज आणि खरबूज दान करावेत. तसेच, या कालावधीत भटक्या कुत्र्यांना खायला देणे देखील खूप शुभ मानले जाते. ज्येष्ठ महिन्यात, आपण गरजू लोकांना आंबे आणि पाण्याचे माठ देखील दान करू शकता. हा उपाय केल्याने व्यक्तीला आयुष्यात कधीही कमतरता भासत नाही आणि घरात शांतता लाभते.



असेही म्हटले जाते की, ज्येष्ठ महिन्यात देणगी दिल्याने एखादी व्यक्ती मृत्यूनंतर यमाच्या सापडलेल्या दुःखापासून मुक्त होऊ शकते आणि एखादी व्यक्ती तेथे मिळालेली शिक्षा देखील टाळू शकते.

ज्येष्ठ महिन्यात वरुण देवाचीही पूजा केली जाते. वरुण देव पावसाची देवता आहे, म्हणून या महिन्यात त्यांची पूजा केल्याने चांगला पाऊस होतो आणि शेतकऱ्यांना फायदा होतो.

देवी पार्वती- ज्येष्ठ महिन्यात पार्वतीचीही पूजा केली जाते. माता पार्वतीची उपासना



केल्याने सुख समृद्धी प्राप्त होते. ज्येष्ठ महिन्यात पार्वतीची पूजा केल्याने सुख, समृद्धी आणि वैवाहिक सुख प्राप्त होते.

सूर्य देव - ज्येष्ठ महिन्यात सूर्यदेवाची पूजा करण्याचीही परंपरा आहे. या महिन्यात सूर्याची तीव्रता वाढते, त्यामुळे सूर्यदेवाला अर्घ्य दिल्याने आरोग्य आणि समृद्धी मिळते.

देवी गंगा- ज्येष्ठ महिन्यात गंगा दसरा साजरा केला जातो. या दिवशी गंगा नदीत स्नान करून गंगा मातेची पूजा केल्याने पापांचा नाश होऊन मोक्ष प्राप्त होतो. यावेळी १६ जून रोजी गंगा दसरा साजरा केला जाणार आहे.

हनुमान- ज्येष्ठ महिन्यात हनुमानाची पूजा केल्याने शक्ती, बुद्धी आणि धैर्य मिळते. या महिन्यात येणाऱ्या मंगळवारला मोठा मंगळवार म्हणतात.

या देवी-देवतांची पूजा करण्यासाठी काही नियमांचे पालन करणे आवश्यक आहे, ज्याबद्दल तुम्हालादेखील माहिती असणे आवश्यक आहे. सर्व प्रथम, आंघोळ करा आणि स्वच्छ कपडे घाला. दिवा लावा आणि धूप जाळा. देवी-देवतांना फुले आणि फळे अर्पण करा. देवी-देवतांना नैवेद्य अर्पण करा. देवी-देवतांच्या मंत्रांचा जप करा. देवी-देवतांची आरती करावी. ज्येष्ठ महिना हा देवी-देवतांच्या उपासनेसाठी आणि आध्यात्मिक विधींचा पवित्र महिना आहे. या महिन्यात या देवी-देवतांची पूजा केल्याने सुख,समृद्धी, मोक्ष, आरोग्य, बल आणि बुद्धी प्राप्त होते.

# सुख शांती समाधान


## घरात अन्नपुर्णा मातेची पूजा अवश्य करा...

वास्तु शास्त्रासारखे विशेष महत्त्व आहे. असे म्हटले जाते की ज्या व्यक्तीचे घर वास्तूच्या नियमांची काळजी घेऊन तयार केले गेले आहे, तेथे नेहमीच आनंद, शांती आणि समृद्धी असते. तसेच, त्यामुळे घरात दोष उद्भवत नाही. त्याचप्रमाणे, वास्तुशास्त्रामध्ये घराच्या वेगवेगळ्या ठिकाणी चित्रे ठेवण्याच्या नियमांचा उल्लेखही केला गेला आहे.

बऱ्याचदा घरात वेगवेगळ्या देवतांची फोटो, छायाचित्रे ठेवतो. परंतु स्वयंपाकघरात कोणती देवता ठेवली पाहिजे हे माहिती आहे का? वास्तू शास्त्राच्या मते, जर आपण आपल्या स्वयंपाकघरात हे चित्र ठेवले तर ते चांगले फळ देते. वास्तू शास्त्राच्या मते, जर आपण स्वयंपाकघरात आई अन्नपुर्णेचे चित्र ठेवले तर आसपासचे वातावरण नेहमीच सकारात्मक राहते. तसेच, घरात नेहमीच आनंद आणि शांती नांदते. घरात कधीही अन्नाची कमतरता नसते, असे म्हटले जाते की, स्वयंपाकघरात आई अन्नपुर्णेचे चित्र ठेवले तर घरात कधीही अन्नधान्याची कमतरता जाणवत नाही. तसेच, स्वयंपाकघरात कधीही अन्नाची कमतरता भासत नाही.

वास्तुनुसार, आई अन्नपुर्णेचे चित्र लावल्याने जेवणात स्तात्विकता येते. तसेच तिची कृपा कुटुंबातील सदस्यांवर कायम असते. परंतु आई अन्नपुर्णेचे चित्र ठेवताना हे लक्षात ठेवले पाहिजे की आपण जिथे तिचे चित्र लावत आहात तिथे अजिबात घाण नसावी, तेथील जागा स्वच्छ असावी. जर आपण धूळ आणि घाणीच्या जागी आई अन्नपुर्णेचे चित्र ठेवले असेल तर ते अशुभ नसते. त्यामुळे आपण जिथे आई अन्नपुर्णेचे चित्र लावणार आहोत तेथे नेहमी स्वच्छता पाहिजे. स्वयंपाकघरातही कायम स्वच्छता ठेवली पाहिजे. असे केल्याने, आई अन्नपुर्णा आनंदी होऊन आपल्याला आशीर्वाद देते. तसेच विशेष कृपा मिळते.

आई अन्नपुर्णेचे चित्र स्वयंपाकघरात वास्तूच्या नियमांची काळजी घेऊन ठेवले असेल तर घरात कधीही संपत्तीची कमतरता भासणार नाही, असे मानले जाते की स्वयंपाकघरात आईचे चित्र लावल्याने घरात सकारात्मक उर्जा निर्माण होते. तसेच स्वयंपाक करताना मन शांत, आनंदी राहते. आई अन्नपुर्णेचे एक चित्र स्वयंपाकघरात लावल्याने त्या व्यक्तीचे घरात एक बरकत मिळू शकते आणि कुटुंबातील सदस्यांना जीवनात यश मिळू शकते.



परंतु यासाठी, ते चित्र योग्य दिशेने ठेवणेदेखील आवश्यक आहे. असे मानले जाते की स्वयंपाकघरातील चित्र अशा प्रकारे असावे की जेव्हा आपण अन्न शिजवता तेव्हा आई अन्नपुर्णेचा चेहरा आपल्यासमोर येईल.

आई अन्नपुर्णेचे चित्र लावल्याने खूप शुभ परिणाम मिळतो आणि तिचा विशेष आशीर्वाद घराच्या सदस्यांवर राहतो. आपल्या घराच्या स्वयंपाकघरात, आपण आई अन्नपुर्णेसह फळे आणि अन्नाचे चित्र देखील ठेवू शकता. त्यामुळे स्वयंपाकघरात नेहमीच अन्नाचे भांडार भरलेले राहाते.

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# ॲसिड हल्ल्याच्या आरोपीची खुल्या तुरुंगाची मागणी फेटाळली

■ छत्रपती संभाजी नगर

**ॲसिड** हल्ला केल्याप्रकरणी कोठडीत असलेल्या आरोपीची खुल्या तुरुंगात पाठवण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळली आहे. प्रत्येक कैद्याने कारागृहाचे नियम पाळले पाहिजेत व प्रत्येकाला खुल्या तुरुंगात कायम राहाता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. आरोपी अंकुर नारायण पनवर याने २०१३ मध्ये प्रिती राठी या २३ वर्षीय मुलीवर ॲसिडने हल्ला केला होता. त्यानंतर तिचा मृत्यू झाला. प्रिती मुंबईतील नौदलाच्या रुग्णालयात नर्स म्हणून रुजू होण्यासाठी दिल्लीहून वांद्रे टर्मिनस येथे आली असता आरोपीने तिच्यावर ॲसिड फेकले. त्यानंतर तिला रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र तिला झालेल्या अंतर्गत जखमांमुळे तिचा मृत्यू झाला. पनवर याला २०१६ मध्ये मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. त्याला काही दिवस खुल्या कारागृहात ठेवण्यात आले होते. त्यानंतर बंदिस्त कोठडीत ठेवण्यात आले. आपल्याला पुन्हा खुल्या कारागृहात ठेवण्याची याचिका त्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे केली होती. न्यायालयाने ती फेटाळली असून खुल्या कारागृहात सतत राहाता येणार नाही, असेही स्पष्ट केले.

# जालन्यात अनुदान वाटपात मोठा घोटाळा

■ जालना

**जालना** जिल्ह्यात अतिवृष्टी आणि गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेल्या अनुदान वाटपात मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. बनावट शेतकरी तयार करून तब्बल ३५ कोटी रुपयांचा निधी हडप केल्याचा आरोप जिल्ह्यातील २६ अधिकाऱ्यांवर आहे. या प्रकरणात जिल्हा प्रशासनाने तातडीने कारवाई करत १० तलाठ्यांना निलंबित केले आहे.

## १० तलाठी निलंबित

जालना जिल्ह्यात २०२२ ते २०२४ दरम्यान अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शासनाकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून अनुदान मंजूर करण्यात आले. मात्र या अनुदान वाटप प्रक्रियेत अंबड व घनसावंगी तालुक्यातील काही गावांमध्ये गंभीर गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्या होत्या. चौकशीदरम्यान ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक अशा एकूण २६ अधिकाऱ्यांनी बनावट शेतकऱ्यांची नावे तयार करून शासकीय निधी अपहार केल्याचे स्पष्ट झाले.

प्राथमिक टप्प्यात दोषी आढळून आलेल्या १० तलाठ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून उर्वरित दोषी अधिकाऱ्यांच्या खुलाशांनंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

# मुंबईतील समुद्राचे खारे पाणी गोडे करणार! २१ कंपन्या इच्छुक

■ मुंबई

**मुंबईकरांची** पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता पालिका प्रशासनाने मुंबईतील समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याची योजना आखली आहे. या निःक्षारीकरण प्रकल्पासाठी चौथ्यांदा निविदा मागवल्या आहेत. त्यासाठी घेण्यात आलेल्या पूर्वबोली बैठकीमध्ये तब्बल २१ कंपन्यांनी आपले स्वारस्य दाखवले आहे. या इच्छुक कंपन्यांमध्ये आखाती देशातील एका आणि स्पेनमधील एका कंपनीचा समावेश होता. मनोरी येथे उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पाचा अंदाजित खर्च ४४०० कोटींच्या घरात असणार आहे. पालिकेने गेल्या महिन्यातच २८ मे पासून या निःक्षारीकरण प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात केली आहे. यासंदर्भातील पूर्वबोली बैठकीला हजेरी लावलेल्या २१ कंपन्यांना येत्या २६ जूनपर्यंत अर्ज करता येणार आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळातच या प्रकल्पाला सुरुवात होणार होती. परंतु राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर हा प्रकल्प तीन-चार वर्षांपासुन रखडला गेला. मात्र आता हा प्रकल्प हाती घेण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यासाठी चौथ्यांदा निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च ४४०० कोटी रुपये इतका असून आधीच्या खर्चात १ हजार कोटींची वाढ झाली असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकल्पांतर्गत पाणी आणण्यासाठी तीन जलबोगदे उभारावे लागणार आहेत.

## निविदा प्रक्रियेत परदेशी दोन कंपन्या

# मुरबाडमध्ये भाजपाच्या ९ नगरसेवकांचा स्वतंत्र गट

■ मुरबाड

**राज्यात** भाजपाची ताकद वाढत असतानाच मुरबाड नगरपंचायतीत भाजपाच्या ९ नगरसेवकांनी आपल्या पक्षाला आव्हान देत स्वतंत्र गट स्थापन केला. यामुळे मुरबाडच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. राज्याच्या राजकारणात भाजपामध्ये अशाप्रकारे थेट पक्षाविरोधात स्वतंत्र गट स्थापन करण्याची ही पहिलीच घटना असल्याचे सांगितले जाते. या नगरसेवकांनी अजून अधिकृतरित्या पक्षत्याग केलेला नाही, मात्र भाजपाच्या स्थानिक नेत्यांच्या हुकूमशाही कारभाराला विरोध करण्यासाठी त्यांनी स्वतंत्र गट स्थापन केला आहे.

# उंबरमाळी स्थानकात एक्स्प्रेसमध्ये बिघाड

■ कल्याण

**मध्य** रेल्वेच्या कल्याण-कसारा रेल्वे मार्गावरील खर्डी ते उंबरमाळी रेल्वे स्थानकांच्या दरम्यान मुंबईकडे येणाऱ्या एका एक्सप्रेसच्या इंजिनमध्ये आज दुपारी १२ वाजताच्या सुमारास बिघाड झाला. ही एक्स्प्रेस खर्डी-उंबरमाळी रेल्वे स्थानक भागात खोळंबली असल्याने कसारा, नाशिककडून मुंबईकडे येणारी मेल, एक्सप्रेस आणि लोकलची वाहतूक मागील दीड तासाहून अधिक काळ ठप्प झाली होती. बिघाड झालेल्या एक्स्प्रेससाठी कल्याणहून दुसरे इंजिन मागवण्यात आले. त्या इंजिनच्या सहाय्याने गाडी पुढे रवाना करण्याचे काम सुरू करण्यात आले. या तांत्रिक अडचणीमुळे अप आणि डाऊन दोन्ही मार्गांवरील लोकल सेवा २५ ते ३० मिनिटे विलंबाने धावत होती. गाड्या उशिराने धावत असल्यामुळे विविध रेल्वे स्थानकांवर प्रचंड गर्दी झाली होती. विशेषतः मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मोठे हाल झाले. तसेच लांब पल्ल्याच्या गाड्यांचे वेळापत्रकही कोलमडल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली.

# राज्य कांदा धोरणासाठी १९ सदस्यीय समिती

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करून स्थिर व न्याय्य दर निश्चित करण्यासाठी राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली १९ सदस्यांची कांदा धोरण समिती स्थापन करण्यात आली आहे. महाराष्ट्र हे देशातील प्रमुख कांदा उत्पादक राज्य आहे. भारतातून होणाऱ्या एकूण कांदा निर्यातीपैकी ४० टक्के निर्यात महाराष्ट्रातून होते. मात्र, उत्पादनात आघाडीवर असूनही शेतकऱ्यांना किमतीतील अस्थिरता, साठवणुकीसाठी पायाभूत सुविधांचा अभाव, निर्यातीवरील निर्बंध आणि काढणीपश्चात होणारे नुकसान यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. कांद्याच्या दरात सातत्य राखणे, साठवणूक सुविधा वाढवणे, निर्यात प्रोत्साहन देणे, बाजार व्यवस्था सुधारणे आणि शेतकरी हितासाठी उपाययोजना सुचवणे, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ही समिती काम करणार आहे. कांदा पुरवठा साखळीतील अडथळ्यांचे विश्लेषण करून उपाययोजना सुचवणे, साठवणुकीची क्षमता वाढवण्यासाठी पावले उचलणे आणि पर्यायी बाजार सादर करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न करण्यावर समितीचा भर राहणार आहे. या समितीचा कार्यकाळ सहा महिन्यांचा असणार आहे. पहिल्या दोन महिन्यांत प्राथमिक अहवाल सादर करण्यात येणार आहे.

**जाहीर सूचना**

माझे अशील **नितिन भोजा शेट्टी** यांच्या वतीने याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील "के-डब्ल्यू" प्रभाग कार्यालयामधील मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील गाव वर्सोवा, अंधेरी तालुका चा सीटीएस क्र. ५३६ (भाग) धारण केलेल्या आणि मोजमाप ६७३.६० चौ.मीटर्स मोठ्या मालमत्तेमधील ६५.५६% अविभक्त हिस्सा, हक्क आणि हितसंबंधाशी सुसंगत मोजमाप ४४१.६० चौ.मीटर्स जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे, तिचे मालक (१) श्री. ओवेन अँथोनी डायस (२) श्री. ॲड्रियन फ्रान्सिस डायस (३) श्री. ब्रायन डेव्हियस डायस, (४) (अ) सौ. व्हिक्टोरिया रॉय डायस (४) (ब) सौ. गेलेन लिझक्विन विजय बर्नेस उर्फ सौ. गेलेन लिझक्विन रॉय डायस (४) (क) श्री. क्रिस्पिन फ्रान्सिस रॉय डायस यांच्याकडून त्यावर उभी "डायस हाऊस" असे ओळखण्यात येणारी, चार सदनिका समाविष्ट असलेली तळमजला + तीन (३) वरील मजले समाविष्ट असणारी इमारत, आणि तसेच "के-डब्ल्यू" प्रभाग कार्यालयामधील मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील, सिल्व्हा पाखाडी रोड, जॉन रोज सीएचएसशेजारी, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००६१ येथे स्थित, वसलेली आणि असलेली मालक श्री. क्लिंट सॅव्हिओ काब्रल आणि सौ. महुआ कामत काब्रल यांची सदनिका क्र. ३०१ सह, पुनर्विकासाकरिता संपादित करीत आहेत.

म्हणून सर्व व्यक्ती/वर्तींना, संस्था/स्थांना आणि किंवा कॉर्पोरेट मंडळ आणि तमाम जनतेस याद्वारे सूचित / मागणी करण्यात येत आहे की, वरील उल्लेखित मालकांद्वारे वरील उल्लेखित मालमत्तेच्या संदर्भात कशाही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा कोणताही हितसंबंध, दावा आणि किंवा हक्क असण्याबाबत त्यांनी खाली दिलेल्या पत्त्यावर निम्नस्वाक्षरीकार यांना कृपया सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून **१४ दिवसांच्या** आत सूचित करावे. तुम्ही सर्वांनी कृपया नोंद घ्यावी की, जर निर्धारित वेळेमध्ये निम्नस्वाक्षरीकारांना उपरोल्लेखित मालमत्तेच्या संदर्भात कोणताही आक्षेप आणि किंवा दावा प्राप्त न झाल्यास असे मानण्यात येईल की, वरील उल्लेखित मालमत्ता सर्व बोजे, प्रभार आणि किंवा शुल्कापासून मुक्त आहे व माझे अशील सदर विकास सुरू करतील.

**मालमत्तेची अनुसूची**

के-पश्चिम प्रभागाच्या महापालिका कार्यक्षेत्रामधील मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील गाव वर्सोवा, अंधेरी तालुका चा सीटीएस क्र. ५३६ (भाग) धारण केलेल्या आणि मोजमाप ६७३.६० चौ.मीटर्स मोठ्या मालमत्तेमधील ६५.५६% अविभक्त हिस्सा, हक्क आणि हितसंबंधाशी सुसंगत मोजमाप ४४१.६० चौ.मीटर्स जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे, व त्यासह सिल्व्हा पाखाडी रोड, जॉन रोज सीएचएसशेजारी, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००६१ येथे स्थित, वसलेली आणि असलेली "डायस हाऊस" असे ओळखण्यात येणारी, तळमजला + तीन (३) वरील मजले समाविष्ट असणारी इमारत आणि चतुःसीमा खालीलप्रमाणे:

उत्तरेस किंवा त्या दिशेने: डिस्पेन्सरी रोड/सिल्व्हा पाखाडी रोड;

दक्षिणेस किंवा त्या दिशेने: रस्ता; सीटीएस क्र. ५३६(भाग) २३२

पूर्वेस किंवा त्या दिशेने: सिल्व्हा पाखाडी रोड;

पश्चिमेस किंवा त्या दिशेने: सीटीएस क्र. ५३७, जॉन रोज सीएचएस लि.

**ठिकाण:** मुंबई **दिनांक:** १५.०६.२०२५

**गजेंद्र सी. सिंग**

ॲडव्होकेट उच्च न्यायालय

पत्रव्यवहाराचा पत्ता: सी-६०२, सिद्धांत कॉम्प्लेक्स, डॉ. राधाक्रिष्णा मार्ग, ऑफ जुना नागरदास मार्ग, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००६९.

मोबा.: ९८२१२४३७७६, व्हॉट्सॲप क्र. ९८२१२४३७७६

ईमेल आयडी: gc.singh@yahoo.com

आपला विश्वासू

ॲडव्होकेट उच्च न्यायालय मुंबई

**सौ देविबाई नारायणदास छाबडा ग्रामिण शिक्षण संस्था, सातारा**

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याशी सलग्न

**लेट एन. बी. छाबडा मिलिटरी स्कूल**

**प्रवेश सुरु शैं. व. २०२५-२६**

२० एकर निसर्गरम्य परिसर
सुसज्ज प्रयोगशाळा
अनुभवी शिक्षक वर्ग
सुसज्ज लायब्ररी

रेसिडेन्शियल, को-एज्युकेशन
५ वी ते १२ वी सायन्स मुले व मुली
रेसिडेन्शियल, स्विमिंग, कराटे प्रशिक्षण

कॅम्पस : - सर्व्हे नं. २५९, पोस्ट: रायगांव, ता. जावली, जि. सातारा (महाराष्ट्र)
हेड ऑफिस: - ३०, गुलमोहर कॉलनी, आय.टी.आय. समोर, गेंडामाळ, सातारा (महाराष्ट्र)
मोब. ९८२२०२५९००, ९८२२०२७७२८, ९८८१३७३७३५
वेबसाईट:www.sdncedu.com ईमेल:sdncres1999@gmail.com

**फॉर्म जी**

एक्सर्बिया आयफेल सिटी, चाकण, महाराष्ट्र येथे मालमत्ता असलेले रिअल इस्टेट आणि बांधकाम उपक्रमांमध्ये कार्यरत

**एक्सर्बिया चाकण डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड करिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन / सीआयएन / एलएलपी क्र. | **एक्सर्बिया चाकण डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड** सीआयएन क्र.: U45209PN2012PTC142553 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कार्यालय क्र. १२५/१२६, पाटील प्लाझा मित्रमंडळ चौक, पर्वती, पुणे, महाराष्ट्र ४११००९. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | उपलब्ध नाही |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | कॉर्पोरेट ऋणकोकडून प्राप्त माहितीनुसार ८ न विकलेल्या सदनिका, आणि संयुक्त विकास कराराअंतर्गत प्राप्य |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | लागू नाही |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | उपलब्ध नाही |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | ० |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी समाविष्ट असलेल्या पुढील तपशील उपलब्ध असलेले यूआरएल: | आरपी यांना xrbiachakan.ibc@gmail.com येथे ईमेल लिहून प्राप्त करता येईल. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असलेले यूआरएल: | xrbiachakan.ibc@gmail.com येथे ईमेल लिहून प्राप्त करता येईल. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक: | ३० जुलै, २०२५ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | ९ ऑगस्ट, २०२५ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | १४ ऑगस्ट, २०२५ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | २३ ऑगस्ट, २०२५ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | २३ ऑगस्ट, २०२५ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | २२ सप्टेंबर, २०२५ |
| १६. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | xrbiachakan.ibc@gmail.com |

दिनांक: १५ जून, २०२५
ठिकाण: मुंबई

संजय जेसवानी
ठराव व्यावसायिक
एक्सर्बिया चाकण डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02891/2024-2025/14432
ईमेल : xrbiachakan.ibc@gmail.com
पत्ता: लेव्हल १५, देव कॉर्पोरा, पूर्व द्रुतगती महामार्ग, ठाणे पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र - ४००६०१.
एएफए वैधता: ३० जून, २०२५.

महावितरण


**जाहीर सुचना**

डोंबिवली विभागातील वीज ग्राहकांना कळविण्यात येते की, **सोमवार दि. १६.०६.२०२५** रोजी खालील वीज वाहिनीचा वीज पूरवठा महत्वाच्या दुरूस्तीचे काम व देखभालीसाठी खाली दर्शविलेल्या वेळेत बंद राहील. तरी संबधीत वीज ग्राहकांनी कृपया सहकार्य करावे ही विनंती.

| उपकेंद्र | फिडर | दिनांक | वेळ | प्रभावित क्षेत्र | कामाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| २२ केव्ही बाजीप्रभु स्विचिंग स्टेशन | २२ केव्ही गणेश मंदिर फिडर | १६.०६.२०२५ | सकाळी १०.३० ते दुपारी ०२.३० | गणेश मंदीर, फडके रोड,नेहरू रोड, जोशी हायस्कूल, पी. पी. चेंबर, आगरकर रोड,भगतसिंग रोड | अतिमहत्वाचे दुरूस्ती काम करण्यासाठी |

कार्यकारी अभियंता, डोंबिवली (ना) विभाग म.रा.विज.वितरण कं.मर्यादित

# नवाकाळ शब्दकोडे-१२८३



**आडवे शब्द –**

१. भाळ, ललाट ३. नोकर ५. चिखल ७. कुरूप ११. गुंडांनी धमकावून उकळलेले धन १२. वादळ १३. चौकशी १४. ज्ञानेश्वरांतील प्रार्थना १७. मुंबईचे एक उपनगर, जिना १९. पेठ, मोहल्ला २०. निकामी; खेळताना आउट झालेला २१. ग्लानी, उत्साहाचा अभाव २१. जुन्या काळचे एक माप, साधारण चाळीस शेर २२. धीर सुटलेला, निराश २५. उपमर्द २७. जीव २८. आंब्याच्या कोयीपासून किंवा करवंटीपासून केलेली छोटी पळी ३१. अदा, सवय ३३. कोयता ३५. खुशामतीखातर दिलेली भेटवस्तू ३७. उन्माद ३८. शेजारी ४१. चढेल, गर्विष्ठ ४४. गरीब ४५. आपलेच खरे करणे ४६. कंटाळा, उबग ४७. त्रासलेला ४८. कापडाच्या दुकानातले अखंड कापडाचे ठाण ५०. कुंपण ५१. विपरीत बुद्धी सुचण्याचा काळ ५३. लढाऊ नौकांचा ताफा, नाविक दल ५४. उताविळपणा ५६. मोठा ५७. झावळीच्या पातीतील काडी ५८. कार्यक्रम, सोहळा ५९. मिश्रण, खिचडी ६१. दळलेली हळद ६२. सुटलेले पोट, ढेरी ६३. हाळी, हाक ६५. ओहोटीनंतर येणारी ६६. गायक ६९. रुष्ट, रुसलेला ७१. गेरू ७२. लुच्चा, ठक ७४. शेणी ७५. कारस्थान रचताना झालेले एकमत ७७. रात्र ७८. सूर्य ८०. खूप खाणारा ८२. बैठ्या खेळाचा मांडलेला डाव; तक्ता; पडदा ८३. हत्ती, गज ८५. धार्मिक व्रत ८७. रामाचे एक गुरू ९१. लहानसहान, किरकोळ ९४. संवत्सर ९५. सोंगटी ९७. चालवणारा, ड्रायव्हर ९९. विडा रंगवणारा घटक १००. नवरदेव १०१. फोडणी दिलेले ताक १०२. होडी १०४. मार्ग, वाट १०६. आठवड्याचा एक भाग १०७. समाविष्ट, अंतर्भूत १०९. पृथ्वी ११०. वाजवीहून जास्त १११. सकृतदर्शनी ११३. वर्तुळ ११४. कुबेराचा सेवक ११५. पद्धत ११६. परिधान करणे

**उभे शब्द –**

१. बाजू २. तेजस्वी ३. सोनेरी रंगाचे सुगंधी फूल, चंपक ४. कडोसरी ५. अंग पुसण्याचे मऊ वस्त्र ६. तलवार ८. द्रौपदीचे वडील ९. अर्धी ओंजळ १०. व्यवसाय ११. वेदना १२. कमी प्रमाणात १३. प्रिय व्यक्ती दूर असणे १५. जानवे १६. नेत्र, डोळे, चक्षू १८. पाषाण २०. लहान मूल २१. माजलेला २३. वृद्धी, वर्धन २४. दुराव्यानंतरचा मनोमिलाफ, मैत्री २६. छपराखाली बांधलेली बसकट माडी, पोटमाळा २७. मुक्या जनावरांवर दया करणारा २९. नम्र, विनयी ३०. पहिलवानाचा पौष्टिक आहार ३२. ताकद ३४. चिथावणी ३६. मासे पकडण्याचे जाळे ३७. माणुसकी ३९. मोजदाद ४०. पडदा ४२. पुष्कळ ४३. कुचकामी लोकांची भरताड ४६. व्याधी ४८. चांदणी ४९. हुशारी, चातुर्य ५१. जेवणानंतर मुखशुद्धीसाठी खाल्ला जाणारा पदार्थ, तांबूल ५२. हुतात्मा ५३. सुरुवात ५५. जाडसर दळलेले गहू ५६. दुष्कीर्त ५८. किडकिडीत ६०. पेरणी ६३. कोल्हापुरी अलंकार ६४. लोणी ६७. उपवासाला चालणारे एक धान्य ६८. राजीनामा ७०. रात्रीचा पाऊस ७१. काम, प्रयोजन ७३. चार चाकी दणकट वाहन ७४. नाशिकची नदी ७६. अभिनेता ७७. वालुकामय प्रदेश ७९. लग्नातली वधू ८१. खात्री, हमी ८४. शिळे वर्तमानपत्र ८६. ओंडक्यांचा कामचलाऊ पूल ८८. आर्जवे ८९. कुत्र्यासारखे तोंड असलेला मांसाहारी पशू ९०. समशेर ९१. वार्ता ९२. श्वान, कुत्रा ९३. डौलदार ९६. लपवणे ९८. जादूटोणा ९९. बांगड्यांचा विक्रेता १०३. चांदी, रूपे १०५. हात, हस्त १०८. अतिशय अल्प; सूक्ष्म अंश ११२. ऋण, उसने आणलेले द्रव्य •

**नवाकाळ कोडे क्रमांक १२८२चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. जामदारखाना ७. द्रुम ८. श्यामसुंदर १२. विमाता १४. तन १५. पराभूत १७. शमन १८. याम १९. हनन २०. लत २१. रयत २२. अक्कल २४. गदा २५. कांब २६. रापण २७. सफल २८. पोरवय ३०. रहस्य ३२. अजाण ३३. निखारा ३४. हर ३६. शील ३७. जोगवा ३८. तनू ३९. कट ४१. मेरुदंड ४२. कसबा ४४. वाट ४५. कव ४६. आनंद ४८. थरकाप ५०. वेसण ५१. यम ५३. बोगदा ५४. प्राध्यापक ५६. करमणूक ५८. नलिन ६०. गौप्य ६१. लावालावी ६३. सही ६५. नरक ६७. सारी ६८. क्रय ६९. आसरा ७१. वीरश्री ७३. तख्त ७४. नस ७८. डबीर ७९. पावन ८२. बंदिवान ८४. पोरस ८६. बादरायण संबंध ८८. दरबार ८९. परिमल ९१. गाडी ९३. वध ९५. चावा ९६. मत ९८. पुनव १००. अधिक १०१. खडाष्टक १०२. रज १०३. खिडकी १०४. मधाळ १०५. रेडा १०६. सराफ १०७. कानन १०८. बारकावा १०९. क्लिष्टता

**उभे शब्द** : १. इमानदार ३. मतलब ४. दानत ५. खापरपणजोबा ६. नारायण ७. द्रुत ८. श्यामल ९. मन १०. दया ११. रमणीय १२. विहग १३. तान १६. भूत १७. शक्कल २२. अफरातफर २३. सार २५. कांस्य २६. राजा २७. सखा २८. पोरकट २९. वर्ण ३१. हस्तिदंत ३२. अलकनंदा ३३. निवारा ३५. पामेरियन ४०. रवण ४३. सद ४४. वापर ४५. कसकस ४६. आगटी ४७. सध्या ४८. थकवा ४९. काकवी ५०. वेणू ५२. मलिन ५४. प्राप्य ५५. पलायन ५७. मयसभा ५९. नरवीर ६०. गौरीतनय ६२. लाखी ६४. हीन ६६. कर ७०. षोडषोपचार ७२. श्रीपाद ७५. सबंध ७६. प्रवाद ७७. दूर ८०. वराह ८१. प्रसंगावधान ८३. नरम ८४. पोरवडा ८५. सख्य ८६. बालमखिरा ८७. बंडी ९०. रिवाज ९२. अधिकार ९४. धष्टपुष्ट ९७. तडफ ९९. नमन १०१. खडा १०५. रेवा

# साप्ताहिक राशिभविष्य




**रविवार १५ जून २०२५ ते शनिवार २१ जून २०२५**

- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे.

## मेष

**या** आठवड्यात कामाचा व्याप वाढेल. मनाप्रमाणे गोष्टी घडवून आणण्यासाठी जिद्दीने कार्यरत राहा. व्यावहारिक दृष्टिकोनामुळे चांगले यश मिळेल. अनुभवी लोकांच्या सल्ल्याने एकदा निर्णय घेतला की त्यावर ठाम राहा. खरे शत्रू ओळखा. कोणाच्याही मदतीवर अवलंबून राहू नका. आर्थिक आवक चांगली असली तरीही अनपेक्षित खर्चही येऊ शकतात. जोडीदाराबरोबर सुसंवाद राहिल्यामुळे अडचणींवर मात करता येईल. रागावर व बोलण्यावर मात्र नियंत्रण हवे. मुलांशी सौम्यपणे वागा. कुटुंबाच्या हितासाठी काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. लवकरच त्याचे योग्य, चांगले परिणाम दिसून येतील. मौजमजेकडे कल राहील.

व्यावसायिकांनी गुंतवणूक करताना आर्थिक जोखीम घेऊ नये. नवीन व्यवहार, संधी समोर असतील. नोकरदारांच्या अधिकारांमध्ये वाढ होऊन कामाचे प्रमाण वाढेल. भागीदारीमुळे व्यवसायामध्ये यश मिळेल. मनातील योजना प्रत्यक्षात येतील. स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी योग्य वेळी कृती आवश्यक ठरेल. शेअर मार्केट, सेवा क्षेत्र, खाद्यपदार्थ, आर्थिक क्षेत्र, भाषा, तांत्रिक विभाग, जाहिरात, पर्यटन, मीडिया यासाठी यशदायक काळ आहे.

श्वसनविकार, मणक्याचे आजार, नेत्रविकार, तोंड येणे, पचनविकार, पायांचे दुखणे, रक्तदाब अशा त्रासांकडे विशेष लक्ष द्यावे. मन स्थिर ठेवावे.

**शुभ दिनांक :** १५, १६, १७, १८.

## वृषभ

**आठवडा** सर्वसाधारणपणे चांगला जाईल. आरोग्याची काळजी घ्या. कुठल्याच क्षेत्रामध्ये नियमबाह्य वर्तन करू नका. कामाचे नियोजन अत्यंत आवश्यक आहे. मनामधील गोंधळ टाळण्यासाठी सखोल माहिती व व्यावहारिक दृष्टिकोन उपयोगी ठरेल. फार उशीर न करता कृतीला प्राधान्य द्या. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून लोकांना दिशा दाखवायचे काम तुम्हाला करावे लागेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. घरातील वातावरण चांगले ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. घरदुरुस्ती, सुधारणा यासाठी खर्चाची तरतूद करून ठेवा. वारसाहक्काने मिळणाऱ्या धनासंबंधित प्रश्न मार्गी लागतील. वेळप्रसंगी थोडी माघार, थोडा कमीपणा घ्या. घरातील ज्येष्ठांशी वाद होऊ शकतो. मुलांची प्रगती समाधानकारक राहील. जोडीदाराचे अलिप्त राहण्याचे धोरण असले तरी सहकार्य मिळेल. नोकरदारांना वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. व्यावसायिकांना नवीन संधीचा लाभ घेता येईल. स्पर्धकांवर मात करू शकाल. केलेल्या कामाचे पैसे मिळतील. प्रवासातून लाभ होईल. सरकारी क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, शेअर मार्केट, शिक्षण, सेवा क्षेत्र, तांत्रिक विभाग यासाठी चांगला काळ आहे.

पोटाचे विकार, मूत्रविकार, मधुमेह, नेत्रविकार, अशक्तपणा, संसर्ग, श्वसनविकार याकडे वेळीच लक्ष द्या. मानसिक आरोग्य जपा.

**शुभ दिनांक :** १७, १८, १९, २०.

## मिथुन

**आठवड्याचा** पूर्वार्ध थोडासा अडचणीचा अडथळ्यांचा असेल. उत्तरार्ध मात्र यश देणार आहे. कामाचा व्याप वाढणार आहे. अतिविचारामुळे निर्णय घेणे अवघड होईल. मन स्थिर ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. स्वतःच्या निर्णयक्षमतेवर विश्वास ठेवा. तात्पुरत्या फायद्याचा विचार न करता व्यापक योजना आखा. उत्तरार्धात आर्थिक आवक वाढेल. योग्य प्रकारे गुंतवणूक करू शकता. कुटुंबामध्ये एकत्रित व्यवसाय असल्यास फायद्याचा ठरेल. जोडीदाराबरोबर काही मतभेद राहिले तरी सुसंवाद राहील. मुलांसाठी अधिक आर्थिक तरतूद करावी लागेल. भावंडांशी जमवून घ्यावे लागेल.

नोकरदारांनी काम अचूक पार पाडावे. अधिकार व जबाबदारीमध्ये वाढ होईल. कामाचा व्याप वाढेल. व्यावसायिकांनी कामामध्ये सातत्य राखावे. आक्रमकता योग्य ठिकाणी वापरा. स्पर्धेमध्ये पुढे राहण्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोन उपयोगी पडेल. स्वतःच्या क्षमतेचा पूर्ण विचार करूनच व्यवहार करा. सरकारी क्षेत्र, मास मीडिया, खेळ, तांत्रिक क्षेत्र, सेवा, आर्थिक, आयटी क्षेत्रामध्ये यश मिळू शकते.

पित्तविकार, रक्तदाब, उष्णतेचे विकार, नेत्रविकार, मणका, श्वसनविकार, ॲलर्जी, मूत्रविकार, पायाचे दुखणे या संबंधित त्रास होऊ शकतात. अपघाताचे भय राहील.

**शुभ दिनांक :** १८, १९, २०.

## कर्क

**सध्या** संमिश्र ग्रहमान आहे. चंद्राचे भ्रमण तुमच्यासाठी जास्त महत्त्वाचे ठरते. आधी केलेल्या प्रयत्नामुळे व्यवहार, योजना पूर्ण होताना दिसतील. आठवड्याचा मध्य अडथळ्यांचा असला तरी त्यावर आत्मविश्वासाने मात करू शकाल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कटु सत्य सुद्धा चांगल्या शब्दात सांगा. आर्थिक स्थिती चांगली राहील. पूर्वीचे येणे काही प्रमाणात वसूल होईल. परिस्थितीनुसार तुमच्या धोरणामध्ये बदल फायद्याचा ठरेल. घरामध्ये काही सुधारणा कराल. कौटुंबिक मतभेदावर सुसंवादाने मार्ग निघेल. जोडीदाराला तुमच्या योजना नीट समजून सांगितल्यास सहकार्य मिळेल. गैरसमज टाळा. संततीच्या समस्या समजून घ्या.

नोकरदारांना नवीन संधी मिळतील. परंतु त्या अमलात आणण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागेल. व्यावसायिकांनी खर्च सावधगिरीने करावा. छुपे स्पर्धक, विरोधक कार्यरत होणार आहेत हे लक्षात ठेवून योजना आखल्यास यश मिळेल. आर्थिक क्षेत्र, पर्यटन, बौद्धिक क्षेत्र, संशोधक, खेळाडू, तांत्रिक विभाग, तंत्रज्ञ, खाद्यपदार्थ, बोलण्याच्या कला या क्षेत्रामधील व्यक्तींसाठी चांगला काळ आहे.

नेत्रविकार, घशामध्ये संसर्ग, उष्णतेचे त्रास, श्वसनविकार, हाडांची दुखणी, अचानक थकवा जाणवणे यासारखे आजार त्रास देतील.

**शुभ दिनांक :** १५, १६, २०.

## सिंह

**राशी** स्वामी रवि अधिकार, सन्मान देणारा ग्रह आहे व तो लाभस्थानी आहे. ऊर्जा, धाडस देणारा तुमचा भाग्यकारक मंगळ ग्रह तुमच्या राशीत आहे. हाती घेतलेले काम आत्मविश्वासाने धडाडीने पूर्ण कराल व त्यासाठी भाग्याची साथ मिळेल. मनासारख्या गोष्टी नियोजनपूर्वक व सातत्याने काम करून पूर्ण कराल. गरज लागल्यास इतरांची मदत घ्या. अहंकार बाजूला ठेवावा लागेल. आर्थिक बाजू चांगली राहील. कौटुंबिक आघाडी सर्वसाधारण राहील. पुढाकार घेऊन काही ठोस निर्णय अमलात आणणे शक्य होईल. अनपेक्षित परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्या. संततीची प्रगती समाधान देईल.

नोकरदार व व्यावसायिकांना नवीन जबाबदारी मिळाल्यामुळे कामाचा व्याप वाढेल. सकारात्मक दृष्टिकोन आणि नियोजनामुळे कामाचे चीज होईल. सन्मान मिळेल. नियमांचे पालन आवश्यक आहे. कार्यक्षेत्रात विनाकारण मतभेद टाळा. भागीदार व तुमच्यामध्ये गैरसमज होऊ देऊ नका. अति धाडसीपणा टाळा. सामाजिक व सरकारी क्षेत्र, पर्यटन, सोशल मीडिया, आयटी, आर्थिक क्षेत्र, पोलीस-सैन्य दल यामध्ये यश मिळू शकेल.

पोषक मूलद्रव्यांची कमतरता, पचनसंस्था, यकृत, रक्तदोष, श्वसन विकार, ॲलर्जी, तोंड येणे, गुडघेदुखी यासारख्या आजारांचा त्रास होऊ शकतो. मानसिक स्थैर्य जपा.

**शुभ दिनांक :** १५, १६, १७, १८.

## कन्या

**हा** आठवडा सर्वसाधारणपणे चांगला जाईल. आठवड्याचा पूर्वार्ध हा कृती करण्याचा व यश मिळवण्याचा राहील. विचार करण्यात फार वेळ न घालवता कामाला प्राधान्य द्या. मनातील नकारात्मक विचार बाजूला ठेवून उत्साह दाखवा. स्पर्धकांवर मात करण्यासाठी जशास तसे वागावे लागेल. हितशत्रू ओळखल्यास त्यांच्यावर मात शक्य होईल. भाग्याची साथ थोडी कमी असल्यामुळे संयम ठेवावा लागेल. व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून धोरण आखा. आर्थिक आघाडी बचत करायला सांगत आहे. कुटुंबामध्ये एकत्रित व्यवसाय असल्यास यश मिळेल. जोडीदार व संततीबाबत संयमाचे धोरण ठेवावे लागेल. भावंडांचे सौख्य जरा कमी राहील. घरासाठी आवर्जून वेळ काढावा लागेल.

नोकरदारांनी आपले काम नियमाप्रमाणे करावे. वादविवाद टाळा. वरिष्ठांची साथ मिळेल. व्यावसायिकांसाठी अनुकूलता राहील. बुद्धीचातुर्याने परिस्थिती हाताळाल. तत्कालीन फायद्यापेक्षा दीर्घकालीन फायदा होईल अशा योजना आखा. शिक्षण क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, सरकारी क्षेत्र, पर्यटन, व्यापार, सेवा क्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र यासाठी चांगला काळ आहे.

रक्तदाब, संसर्ग, मूत्रविकार, पित्तविकार, नेत्रविकार, हार्मोन्स या संबंधित त्रास होऊ शकतात. रोगाचे निदान वेळेत व बरोबर होईल याची विशेष काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** १५, १६, १७, १८.

## तूळ

**आठवड्याचा** पूर्वार्ध कष्ट वाढवणारा तर उत्तरार्ध यशदायक व कष्टाचे चीज करणारा आहे. तुमच्या कष्टाला भाग्याची साथ मिळणार आहे. बुद्धीचातुर्य, कार्याचे सखोल ज्ञान व उत्साह याचा एकत्रित परिणाम यशाकडे नेईल. आर्थिक स्थिती चांगली राहील. कार्यपूर्तीसाठी दुसऱ्यावर अवलंबून राहू नका. अनुभवी लोकांचा सल्ला घेतला तरी निर्णय स्वतः घ्या. या आठवड्यात सैरभैर न होता मन एकाग्र करा. प्रवास व कामाचा व्याप यामुळे घराकडे दुर्लक्ष होऊ शकते. मनामध्ये कुठल्याही शंका ठेवू नका. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कटू शब्द टाळा. जोडीदाराच्या सल्ल्याचा मान राखा, उपयोग होईल. आई व संततीकडे दुर्लक्ष नको.

नोकरदारांना कष्टाचे फळ मिळण्यासाठी थोडे थांबावे लागेल. व्यवसायवाढीसाठी नवीन योजना, व्यवहार अमलात आणताना कायदेशीर सल्ला जरूर घ्यावा. आर्थिक कमाईसाठी अजून एखादा मार्ग शोधू शकाल. मास मीडिया, आर्थिक व सामाजिक क्षेत्र, कलाकार, तंत्रज्ञ, व्यवस्थापन, वैद्यकीय व्यवसाय, सल्लागार या व्यक्तींसाठी हा काळ चांगला आहे.

शीतविकार, पित्तविकार, मूत्रविकार, हार्मोन्स, मधुमेह, श्वसन विकार, अन्ननलिका, रक्तदाब या संबंधित आजारांकडे वेळीच लक्ष द्यावे. मानसिक स्वास्थ्य राखा.

**शुभ दिनांक :** १८, १९, २०.

## वृश्चिक

**आठवड्याच्या** सुरुवातीलाच एखादा नवीन व्यवहार होऊ शकतो. नवीन संधी मिळू शकते. ऊर्जा, उत्साह चांगला राहील. अति धाडसीपणा टाळा. नियमानुसार वागणे उपयुक्त ठरेल. स्वतःच्या क्षमतेनुसारच पुढचे नियोजन करा. कोणावरही अवलंबून राहू नका. हा आठवडा माणसांची खरी ओळख करून देणारा ठरेल. आर्थिक आवक साधारण राहील. खर्च मात्र वाढलेला असेल. त्यामुळे आर्थिक नियोजन अत्यंत आवश्यक आहे. कुटुंबामधील वातावरण थोडेसे तप्त राहील. रागावर नियंत्रण ठेवा. जोडीदार, मुले यांच्याशी विनाकारण वाद होऊ शकतो. संयम ठेवणे उपयोगी ठरेल. आईवडिलांच्या तब्येतीची काळजी घ्या.

नोकरीव्यवसायात मनाप्रमाणे काम करता आले नाही तरी सातत्य राखा. त्याचे चांगले परिणाम नक्की दिसतील. आक्रमकता, धडाडी योग्य ठिकाणी दाखवा. कृतीवर भर द्या. भागीदारीत व्यवसाय असल्यास थोडे सावध राहावे लागेल. सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक वस्तू, रियल इस्टेट, संशोधन क्षेत्र, सीए, वैद्यकीय व्यवसाय, शेअर बाजार यामध्ये यश मिळू शकते.

प्रतिकारशक्ती वाढवा. उष्णतेचे विकार, स्नायू, डोळ्यांची जळजळ, यकृतासंबंधित त्रास, मूत्रविकार, रक्तदाब, नेत्रविकार, मधुमेह याकडे लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** १५, १६, १८.

## धनु

**सध्या** तुमच्यासाठी अत्यंत शुभ ग्रहमान असून तुम्ही याचा फायदा घेतला पाहिजे. काही अडथळे अडचणी नक्की आहेत, पण त्यावर मात करणे सहज शक्य आहे. पूर्ण विचार करून निर्णय लवकर घ्या. कृतीवर भर द्या. नियोजित कामे वेळेत पूर्ण केल्यास चांगला फायदा होईल. अकस्मात मिळणाऱ्या संधीसाठी, परिस्थितीसाठी व्यवस्था करून ठेवा. नेतृत्वगुण उपयोगी पडेल. जबाबदारीत वाढ होणार आहे. सहकारी वर्ग मदतीला घेऊन कामे पूर्ण करावी लागतील. घरामध्ये थोडेसे गंभीर वातावरण राहील. जोडीदाराच्या, संततीच्या मदतीने घरातील प्रश्न मार्गी लावाल. कुठेही नकारात्मक भावना मनामध्ये ठेवू नका. भावंडांचे सौख्य लाभेल. मित्रांबरोबर आनंदात वेळ घालवाल.

नोकरदारांनी कार्यक्षेत्रात संघर्ष टाळावा. सौम्यपणे वागून आपले काम पूर्ण करा. व्यवसायवृद्धीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर उपयोगी ठरेल. भागीदारीतील व्यवसाय नफा मिळवून देईल. लाभाचे प्रमाण चांगले राहील. मात्र आर्थिक गुंतवणूक करताना काळजीपूर्वक करा. फसवणूक होण्याची शक्यता आहे. एखादा छंद व्यावसायिक लाभ मिळवून देऊ शकतो. घाऊक व्यापारी, रियल इस्टेट, कॉस्मेटिक, वैद्यकीय व्यवसाय, सोशल मीडिया, आयटी क्षेत्र यासाठी चांगला काळ आहे.

हार्मोन्स, हाडांची दुखणी, भाजणे, श्वसनविकार, निद्रानाश, उष्णतेचे विकार, अपघाताचे भय या संबंधित काळजी घ्यावी. आजारपणामुळे खर्च वाढेल.

**शुभ दिनांक :** १६, १७, १८.

## मकर

**हा** आठवडा सर्वसाधारणपणे चांगला जाईल. प्रवासाचे योग आहे. तुम्ही जास्त भावनाशील होऊ शकता. परंतु त्यावर नियंत्रण ठेवा. व्यावहारिक दृष्टिकोन बदलू नका. कष्ट करायला तुम्ही कधीच कमी पडत नाही, हे धोरण तुम्हाला उपयोगी पडेल. परिस्थितीनुसार कुठे आक्रमक व्हायचे व कुठे शांत राहायचे याचा योग्य निर्णय घ्या. बोलताना काळजीपूर्वक बोला. नवीन व्यवहार करताना योग्य शब्दांचा वापर आवश्यक ठरेल. अचानक खर्चामध्ये वाढ होईल. अनपेक्षित धनलाभाचेही योग आहेत. गृह सजावट, सुधारणा करण्याकडे कल राहील. कुटुंबामध्ये कुठल्याही कारणाने गैरसमज होणार नाही याची काळजी घ्या. वडिलोपार्जित धनासंबंधीचे प्रश्न मार्गी लावा. कायदेशीर सल्ला उपयोगी पडेल.

नोकरदारांनी, व्यावसायिकांनी नियमांचे उल्लंघन करू नये. लोकांना मदत कराल. त्यामुळे कामाचे नियोजन बिघडू शकते. अनुभवी लोकांचा सल्ला उपयोगी पडेल. मोठ्या पदाची, अधिकाराची अपेक्षा आत्ता ठेवू नका. लहानसहान गोष्टींमध्ये अडथळे आले तरी अनुभवाच्या जोरावर ते सहज पार कराल. सरकारी नोकरी, सेवा क्षेत्र, शेअर मार्केट, रियल इस्टेट, आर्थिक क्षेत्र, पोलीस व सैन्यदल, रसायन, व्यवस्थापन या क्षेत्रासाठी यशदायी काळ आहे.

प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. पचनसंस्था, यकृत, मज्जासंस्था, हाडांचे दुखणे, श्वसनविकार, संसर्गजन्य आजार याकडे विशेष लक्ष द्यावे. दुखणे छोटे वाटले तरी वेळीच वैद्यकीय सल्ला घ्या.

**शुभ दिनांक :** १५, १६, १९, २०.

## कुंभ

**गुरू** व शुक्र यांचे पूर्ण पाठबळ असणार आहे. पंचमातला गुरू ज्ञान वाढवण्याची इच्छा पूर्ण करेल. इच्छाशक्ती वाढणार आहे. भाग्याची साथ मिळेल. तुमच्यातील एखादे कौशल्य तुम्हाला व्यवहारात उपयोगी पडेल. शब्दांचा योग्य वापर अनेक गोष्टी साध्य करून देईल. आर्थिक अडचणी दूर होतील. खर्च कमी करून धनसंचय करण्याकडे कल राहील व त्यात यशही मिळेल. नकारात्मकता नियंत्रणात ठेवा. साशंकता, अनामिक भीती याला थारा देऊ नका. घरामधील वातावरण हळूहळू चांगले होईल. प्रवासानिमित्त बाहेर राहावे लागले तरी घराकडे लक्ष ठेवा. जोडीदाराशी होणारे मतभेद कमी होतील. सामंजस्याची वृत्ती ठेवल्यास संततीशीही सुसंवाद राहील. भावना व व्यवहार यामध्ये समतोल ठेवा. प्रेमीजनांची विवाहाची बोलणी यशस्वी होतील.

नोकरीमध्ये अनपेक्षित उलाढाली होती. वरिष्ठांची साथ फार गृहीत धरू नका. व्यावसायिकांचे व्यवहार, योजना अडचणीनंतर, पण पूर्ण होतील. भागीदारीतील व्यवसायात पारदर्शकता ठेवा. तुम्ही केलेल्या कामाचे पैसे प्रयत्नपूर्वक मिळतील. जिद्द सोडू नका. स्टॉक मर्केट. शिक्षण क्षेत्र, तांत्रिक विभाग, कायदा, संशोधन, स्थावर या क्षेत्रामध्ये यश मिळू शकते.

रक्तदोष, दंतरोग, संसर्गजन्य विकार, पित्ताशय, उष्णतेचे आजार, श्वसनविकाराकडे विशेष लक्ष द्यावे. मानसिक आरोग्य जपा.

**शुभ दिनांक :** १७, १८, १९, २०.

## मीन

**चढउताराचा** आठवडा आहे. सुरुवात चांगली होईल. कल्पनाशक्तीला वाव मिळेल. तुमच्यातली कलाकौशल्याचे व्यवसायात रूपांतर होऊ शकते. खर्चाचे प्रमाण वाढले तरी आर्थिक आवकही चांगली राहील. कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करा. व्यक्तिमत्व विकसित करण्याकडेही तुमचा ओढा राहील. आठवड्याच्या शेवटी आर्थिक बाबतीत विशेष काळजी घ्या. घरामध्ये मिश्र वातावरण राहील. एकत्रित व्यवसाय असल्यास फायदेशीर ठरेल. जोडीदाराबरोबर सुसंवाद राहील. एकमेकांच्या मताचा आदर करा. अहंकार टाळा. शिस्तीचे वातावरण असेल. संततीसाठी आवर्जून वेळ काढा. आईवडिलांचे आशीर्वाद मिळतील.

कार्यक्षेत्रामधील संस्था, संघटन यामध्ये तुमचा सक्रिय वावर वाढेल. तिथे तुम्हाला अधिकार मिळेल. नोकरदारांना अपेक्षित असा सकारात्मक बदल मिळेल. व्यवसायामध्ये कामाचा व्याप वाढेल. विरोधक सक्रिय होतील. जशास तसे वागावे लागेल. मात्र योग्य ठिकाणीच आक्रमकता दाखवा. घरगुती व्यवसाय, खाद्यपदार्थ, शेअर बाजार, रियल इस्टेट, तांत्रिक विभाग व्यवस्थापन, सल्लागार, कलाकार, रसायन, सरकारी संस्था संबंधित क्षेत्रामध्ये यश मिळू शकते.

पित्तदोष, उष्णता, खांदेदुखी, मधुमेह, चुकीच्या खाण्यामुळे होणारे त्रास, भाजणे, जखमा, चुकीचे औषध उपचार, योग्य निदान न होणे याकडे विशेष लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** १५, १६, १९, २०.

नवाकाळ

• मुंबई | रविवार १५ जून, २०२५ • पान -८

# गिरणी कामगारांच्या घरांबाबत मुख्यमंत्री फडणवीस सकारात्मक

■ मुंबई



**गिरणी** कामगारांच्या घरांबाबत काल भाजपा आमदार पराग आळवणी यांच्या नेतृत्वाखाली गिरणी कामगार कृती समितीच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा बंगल्यावर भेट घेतली.

यावेळी त्यांनी गिरणी कामगारांच्या घरांची किंमत कमी करावी, गिरणी कामगार हे पंतप्रधान आवास योजनेचे लाभार्थी होऊ शकतात की नाही याची पडताळणी गृहनिर्माण विभागाकडून व्हावी, गिरणी कामगारांना मुंबईत घरे मिळू शकतात का, याचा गृहनिर्माण विभागाकडे असलेला अहवाल उघड करावा, अशी विनंती केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सर्व मागण्यांना अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. या बैठकीला आमदार पराग आळवणी, गिरणी कामगार कृती समितीचे नेते जयश्री खाडिलकर पांडे, जयप्रकाश भिलारे, प्रविण घाग व नंदू पारकर उपस्थित होते.

# आज तिन्ही मार्गांवर रेल्वेचा मेगाब्लॉक घोषित

■ मुंबई

**विविध** अभियांत्रिकी आणि देखभालीच्या कामांसाठी मध्य रेल्वे मार्गावरील मुख्य व हार्बर आणि पश्चिम रेल्वे मार्गावर अशा तिन्ही मार्गांवर उद्या रविवार १५ जून रोजी मेगाब्लॉक घोषित करण्यात आला आहे. मध्य रेल्वे मार्गावरील सीएसएमटी ते विद्याविहार दम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर स.१०.५५ ते दु. ३.५५ या काळात ब्लॉक असणार आहे. या काळात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरून स. १०.४८ ते दु. ३.४५ या कालावधीत सुटणाऱ्या सर्व डाऊन धीम्या लोकल ट्रेन सीएसएमटी आणि विद्याविहार स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवल्या जाणार आहेत. या गाड्या भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला या स्थानकांवर थांबणार आहेत आणि विद्याविहारपासून पुन्हा डाऊन धीम्या मार्गावर वळवल्या जाणार आहेत. हार्बर मार्गावरील पनवेल-वाशी अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी ११.५ ते दुपारी ४.५ या कालावधीत मेगाब्लॉक असणार आहे. पनवेलवरून स. १.३३ ते दु. ३.४९ या कालावधीत सीएसएमटीहून सुटणाऱ्या अप हार्बर मार्गावरील गाड्या रद्द करण्यात आलेल्या आहेत.

# सीमेवरील झेलबाद नियमात बदल चेंडू एकदाच हवेत उडवता येणार

■ दुबई



**आंतरराष्ट्रीय** क्रिकेट परिषद (आयसीसी) ने सीमारेषेवर झेल घेण्याच्या नियमांमध्ये बदल केला आहे. हा बदल आयसीसीच्या नियम आणि अटींमध्ये या महिन्यापासून समाविष्ट केला जाईल. तर इंग्लंडमधील मेरिलबॉन क्रिकेट क्लब (एमसीसी) तो ऑक्टोबर २०२६ पासून लागू करणार आहे.

नवा नियम हा सीमारेषेवर पकडायच्या झेलाशी संबंधित आहे. सध्या खेळाडू क्षेत्ररक्षण करताना सीमेबाहेर जाऊन हवेत कितीही वेळा उडी मारून नंतर सीमारेषेच्या आत येत झेल पकडत असतात. यापुढे त्यांना सीमारेषेबाहेर असताना फक्त एकदाच हवेत उडी मारून सीमारेषेच्या आत जात झेल पकडता येईल. आता जर एखाद्या क्षेत्ररक्षकाने चेंडू सीमारेषेबाहेर उडी मारून चेंडू दोनदा हवेत उडवला आणि नंतर सीमारेषेच्या आत येत झेल पकडला तर तो झेल मानला जाणार नाही. त्याऐवजी फलंदाजाला धावा मिळतील.

दोन खेळाडूंनी सीमारेषेवर एकत्र प्रयत्न करून झेल पकडला, तर त्यादरम्यान दोन्ही खेळाडूंना सीमारेषेच्या आत राहावे लागेल. म्हणजेच, एका खेळाडूने सीमारेषेवर आलेला चेंडू हवेत फेकला तर तो सीमारेषेच्या आत गेल्यावर दुसऱ्या खेळाडूने झेल पकडला तर तो अवैध ठरेल. या झेलसाठी सीमारेषेबाहेरील खेळाडूला दुसऱ्या खेळाडूने झेल पकडण्यापूर्वी सीमारेषेच्या आत यावे लागेल, अन्यथा फलंदाजाला धावा दिल्या जाईल.

ऑस्ट्रेलियातील बिग बॅश लीग २०२३ (बीबीएल) मध्ये ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू मायकल नेसरच्या वादग्रस्त झेलानंतर या नियमात बदल करण्याची मागणी जोर धरू लागली होती. नेसरने सीमारेषेच्या पलीकडे जात दोनदा हवेत चेंडू फेकत नंतर मैदानाच्या आत येऊन झेल पकडला होता. तो नियमांनुसार वैध मानला गेला. परंतु त्यानंतर यावर बरीच चर्चा झाली होती. त्याआधी २०२० मध्ये ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू मॅट रेनशॉसोबतही अशीच एक घटना घडली होती. रेनशॉने चेंडू सीमारेषेच्या बाहेरून आत उडवला आणि त्यानंतर त्याचा सहकारी खेळाडू टॉम बँटनने झेल पकडला होता. याच पार्श्वभूमीवर जानेवारी २०२५ मध्ये एमसीसीने आयसीसीला एक अधिकृत पत्र पाठवून या प्रकारच्या बनी हॉप कॅचवर (सीमारेषेबाहेर एकापेक्षा जास्त वेळा उडी मारून घेतलेला झेल) आक्षेप घेतला होता. एमसीसीने म्हटले की, सीमेबाहेर हवेत राहून चेंडू वारंवार हवेत फेकणे हे खेळाविरुद्ध आहे आणि ते थांबवले पाहिजे. त्यानंतर आता आयसीसीने स्पष्ट केले की, एखाद्या खेळाडूने सीमेच्या आत राहून हवेत चेंडू फेकला आणि नंतर सीमेबाहेर जाऊन परत आत येऊन चेंडू पकडला तर त्याला मान्यता दिली जाईल. मात्र, दोन वेळा चेंडू हवेत उडवून झेल धरल्यास फलंदाज बाद समजला जाणार नाही.

# संरक्षण व्यवहाराची श्वेतपत्रिका काढा! संजय राऊतांची मागणी

■ मुंबई

**एअर** इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघातामुळे विमान वाहतुकीच्या सुरक्षिततेकडे केंद्र सरकार कितपत गांभीर्याने पाहते असा प्रश्न निर्माण झाला असून मागील दहा वर्षांत हवाई उड्डाण क्षेत्रात झालेल्या सर्व व्यवहारांची सरकारने श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केली. रतन टाटा यांच्या निधनानंतर टाटा समूहाला एअर इंडियाबद्दल गांभीर्य आहे किंवा नाही अशी शंका लोकांच्या मनात येऊ लागली आहे. सरकारने एअर इंडियाचे खासगीकरण केले. पण त्यामुळे सरकारला आपली जबाबदारी झटकता येणार नाही, असे राऊत म्हणाले.

# यंदाही आषाढी दिंड्यांना २० हजार रुपयांचे अनुदान

■ पुणे

**आषाढी** एकादशीनिमित्त मानाच्या १० पालख्यांसह वारीत सहभागी होणाऱ्या ११०९ दिंड्यांना यावर्षीही २० हजार रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातून हे अनुदान मिळणार आहे. यासाठी सरकारने २ कोटी २१ लाख ८० हजार रुपयांच्या अनुदानाला मान्यता दिली आहे.

मागील वर्षी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रेच्या मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या प्रत्येक दिंडीला २० हजारांचे अनुदान



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार पुण्यातील विभागीय आयुक्त यांच्याकडून ११०९ दिंड्यांची यादी प्राप्त झाली होती आणि प्रत्येक दिंडीला २० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले होते. मात्र यावर्षी दिंड्यांना अनुदान जाहीर न झाल्यामुळे वारकरी नाराज झाले होते.

यावर्षीही दिंड्यांना अनुदान द्यावे, अशी मागणी या वारकऱ्यांनी केली. त्यानंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिंड्यांना २० हजारांचे अनुदान जाहीर केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत झालेल्या बैठकीत पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

# नीट-युजी परीक्षेत राजस्थानचा महेश कुमार देशात पहिला

नवी दिल्ली - राष्ट्रीय चाचणी संस्थेने आज नीट-यूजी २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर केला. या परीक्षेत राजस्थानच्या हनुमानगड येथील महेश कुमार याने देशात पहिला क्रमांक पटकावला. त्याला ७२० पैकी ६८६ गुण मिळाले आहेत. मध्य प्रदेशच्या इंदूर येथील उत्कर्ष अवधिया याने दुसरा, तर महाराष्ट्राच्या कृषांग जोशी याने तिसरा क्रमांक मिळवला आहे. यंदा पहिल्या १० यशस्वी उमेदवारांमध्ये केवळ एकच मुलगी आहे. दिल्लीच्या अविका अग्रवाल हिने मुलींच्या गटात अव्वल क्रमांक मिळवला आहे. नीट-यूजी २०२५ परीक्षा ४ मे रोजी देशभरात घेण्यात आली होती. यामध्ये तब्बल २०.०८ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी ११.२३ लाख विद्यार्थ्यांनी पात्रता मिळवली आहे.

# विठ्ठल-रुक्मिणीची चंदनउटी पूजा मंदिराला ३५ लाख रुपयांचे उत्पन्न

■ पंढरपूर



**गुढीपाडव्यापासून** सुरू झालेल्या विठ्ठल-रुक्मिणीच्या चंदनउटी पुजेची सांगता काल करण्यात आली. दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्र सुरू होईपर्यंत दररोज दुपारी पंढरीच्या विठ्ठल-रुक्मिणीच्या चंदनउटी पूजा करण्याची परंपरा आहे. यावर्षी चंदनउटी पुजेतून मंदिर समितीला ३५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. ग्रीष्म ऋतूतील कडाक्याच्या उन्हापासून विठुरायाला आणि माता रुक्मिणीला थंडावा लाभावा या भावनेतून चंदनउटी पूजा केली जाते. या दोन्ही मूर्तींच्या चंदनउटी पुजेची सांगता काल चंदनउटी पूजा सदस्या ॲड. माधवीताई निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते झाली. यंदा प्रथमच श्रींची चंदनउटी पूजा ऑनलाईन पध्दतीने बुकींग करण्याची सोय केली होती. त्यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सांगता समारंभानिमित्त श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये विशेष भोजन व्यवस्था करण्यात आली होती.

# अहमदाबाद विमान अपघातात आणखी एक मृतदेह सापडला

■ अहमदाबाद

**मृतांची संख्या २७५ वर**

**एअर** इंडियाच्या भीषण विमान अपघातानंतर दोन दिवस उलटूनही मृतदेह शोधण्याचे काम सुरूच आहे. आज सकाळी विमानाच्या शेपटीच्या ढिगाऱ्यातून आणखी एक मृतदेह आढळून आला. त्यामुळे मृतांची एकूण संख्या २७५ वर पोहोचली आहे. मृतदेह मागील सीटवर अडकलेला होता. तो शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. हा मृतदेह केबिन क्रूचा असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मृतांच्या नातेवाईकांना मृतदेह सुपूर्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, डीएनए अहवाल येण्यास विलंब होत असल्याने अनेक नातेवाईक ताटकळत आहेत. हॉस्पिटलबाहेर १९२ रुग्णवाहिका आणि शववाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. चालकांनाही सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हॉस्पिटलमधील माहितीप्रमाणे आतापर्यंत २३० जणांचे डीएनए नमुने घेतले » पान २ वर

# उच्चस्तरीय समिती तीन महिन्यांत अहवाल देणार

■ नवी दिल्ली

**एअर** इंडियाच्या विमानाला गुरुवारी अहमदाबादमध्ये झालेल्या अपघाताची सविस्तर माहिती आज केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी पत्रकार परिषदेत दिली. अपघाताची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेली उच्चस्तरीय समिती सर्वंकष तपास करून तीन महिन्यांच्या आत सरकारला अहवाल सादर करणार आहे, असे नायडू यांनी सांगितले.

अपघातानंतर केंद्र सरकारच्या स्तरावर आयोजित करण्यात आलेली ही पहिली पत्रकार परिषद होती. नागरी उड्डाण मंत्रालयाचे सचिव समीर कुमार सिन्हा आणि नागरी उड्डाण मंत्री नायडू यांनी संयुक्तपणे ही पत्रकार परिषद घेतली.

## नागरी उड्डाण मंत्र्यांची माहिती

सर्वप्रथम सिन्हा यांनी अपघाताचा पूर्ण घटनाक्रम तपशिलवार सांगितला. ज्या विमानाचा अपघात झाला त्या विमानाने आधी पॅरिस ते दिल्ली आणि दिल्ली ते अहमदाबाद अशा दोन फेऱ्या कोणत्याही अडथळ्याविना पूर्ण केल्या होत्या, असे सिन्हा यांनी सांगितले.

नागरी उड्डाण मंत्री नायडू म्हणाले की, आपल्या देशात विमान वाहतूक सुरक्षेसंबंधी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. तरीही हा अपघात घडल्यानंतर आम्हालाही वाटले की बोईंग ७८७ श्रेणीतील सर्व विमानांची सुरक्षेसंबंधी तपासणी करणे आवश्यक आहे. केंद्रीय नागरी उड्डाण महासंचलनालयाने (डीजीसीए) बोईंग ७८७ विमानांची काटेकोर तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. इंडियन एअरलाईन्सच्या ताफ्यात एकूण ३४ बोईंग ७८७ विमाने आहेत. त्या सर्व विमानांची तपासणी केली जाणार आहे. आतापर्यंत ८ विमानांची तपासणी पूर्ण झाली आहे. लवकरात लवकर उर्वरित सर्व विमानांची तपासणी पूर्ण केली जाईल. विमान अपघात तपास प्राधिकरणाच्यावतीने (एएआयए) अपघाताचा स्वतंत्र तपास सुरू आहे. हा तपास तांत्रिक स्वरूपाचा आहे. एएआयएला काल तपासात मोठे यश मिळाले आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला आहे. त्यातील माहितीचे तांत्रिक विश्लेषण तज्ज्ञांकडून केले जात आहे.

# अमेरिकेत २ खासदारांच्या घरात घुसून गोळीबार

**महिला खासदारांसह पतीचा मृत्यू**

न्यूयॉर्क - अमेरिकेच्या मिनेसोटातील डेमोक्रॅटिक पक्षाच्या २ खासदारांच्या घरात घुसून हल्लेखोराने जोरदार गोळीबार केल्यामुळे एकच खळबळ उडाली. पहिल्या घटनेत खासदार मेलिसा हॉर्टमन आणि त्यांचे पती मार्क यांचा मृत्यू झाला. दुसऱ्या घटनेत खासदार जॉन हॉफमन आणि त्यांची पत्नी यवेट यांच्यावर अनेक गोळ्या झाडण्यात आल्या आणि त्यात दोघेही गंभीर जखमी झाले. मिनियापोलिस उपनगरातील चॅम्पलिन आणि ब्रुकलिन पार्क येथील अनुक्रमे जॉन हॉफमन आणि मेलिसा हॉर्टमन यांच्या घरांमध्ये पोलिसांच्या गणवेशात हल्लेखोर घुसले. शनिवारी पहाटे दोन आणि साडेतीन वाजता या घटना घडल्या. हल्लेखोरांनी जोरदार गोळीबार केला. त्यात मेलिसा हॉर्टमन आणि त्यांचे पती मार्क यांचा जागीच मृत्यू झाला. जॉन हॉफमन आणि त्यांची पत्नी गंभीर जखमी झाले. पोलिसांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ब्रुकलिन पार्क येथे हॉर्टमन यांच्या घरी पोहोचले तेव्हा हल्लेखोर तिथेच होता. त्याने पोलिसांवर गोळीबार केला. त्यानंतर तो घराच्या मागच्या बाजूला पळून गेला. पोलीस हल्लेखोराचा कसून शोध घेत आहेत.

# दादर शिवाजी पार्क रहिवाशांचा सवाल पालिका पावसात गवत का पेरते आहे?

**८० लाख रुपये खर्च होणार**

■ मुंबई

**शिवाजी** पार्क मैदानावर गवताच्या बियांची पेरणी करण्यास सुरुवात केल्याचा दावा करणाऱ्या मुंबई महानगरपालिकेने प्रत्यक्षात हे काम अद्याप सुरूच केलेले नाही. आता त्यांनी गवत पेरण्याची तयारी केली आहे. त्यावरून शिवाजी पार्क परिसरातील रहिवासी पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. पावसाळ्यापूर्वी करावयाचे काम पावसाळ्यात का करता, असा सवाल रहिवासी करत आहेत.

शिवाजी पार्क रहिवासी संघाचे वैभव रेगे यांनी सांगितले की, पालिकेच्या जी उत्तर वॉर्डाचे सहाय्यक पालिका आयुक्त विनायक विसपुते यांनी माध्यमांशी बोलताना असे सांगितले की, शिवाजी पार्क मैदानावर गवताच्या बियाण्यांची चाचणी घेण्याचे काम सुरू झाले आहे. दहा दिवसांत हे काम पूर्ण होईल. मात्र प्रत्यक्षात मैदानावर ज्या जागी बियांची पेरणी केली जाणार आहे तिथे फक्त कुंपणच दिसत आहे. गवताचा एक कोंबही दिसत नाही.

रहिवाशांनी या संदर्भात पालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेतल्याच्या वृत्ताचाही रेगे यांनी इन्कार केला. आम्ही मागील आठवड्यात वॉर्ड अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्याकडे पावसाळा सुरू झाल्याने गवताची पेरणी पावसाळ्यानंतर करावी, अशी मागणी केली. कारण या कामासाठी ८० लाख रुपये खर्च होणार आहेत. पावसाळ्यापूर्वी पेरणी करणे आवश्यक होते. पण ती न झाल्याने आता पावसाळ्यात पेरणी केली तर पावसाच्या पाण्यात छोटे अंकूर वाहून जातील. ८० लाख रुपयांचा खर्च वाया जाईल. त्यामुळे पेरणी पुढे ढकलावी, अशी विनंती आम्ही केली असे रेगे म्हणाले.

याबाबत विसपुते यांना विचारले असता ते म्हणाले की, शिवाजी पार्क परिसरातील रहिवासी गवत पेरणीचे काम कुठपर्यंत आले याची विचारणा करण्यासाठी आले होते. या कामाला विलंब झाला हे मान्य आहे. कामगार अन्य कामांमध्ये व्यस्त असल्यामुळे विलंब झाला. आता पेरणी पावसाळ्यानंतर करण्याबाबत शक्यता तपासून पाहू. त्यामुळे मैदानावरील गवत पेरणीचा घोळ अद्याप कायम आहे.

# नाशिकमधील वाहतूक कोंडीवरून भुजबळांनी अधिकाऱ्यांना फटकारले

■ नाशिक

मंत्री छगन भुजबळ यांनी आज नाशिकच्या द्वारका सर्कलची पाहणी केली. यावेळी त्यांनी या परिसरात नेहमी होणाऱ्या वाहतूक कोंडीवरून अधिकाऱ्यांना फटकारले. त्यानंतर लगेचच वाहतूक पोलिसांनी धडक मोहीम राबवून तिथे बेकायदेशीरपणे उभी करून ठेवलेली वाहने हटवली, फेरीवाल्यांवर कारवाई केली. द्वारका परिसरात मुंबईतील हाजीअलीच्या धर्तीवर सिग्नल यंत्रणा बसवण्याचे काम सध्या सुरू आहे. या कामाची पाहणी करण्यासाठी भुजबळ येथे आले होते. यावेळी वाहतूक पोलीस, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि पालिकेचे अधिकारी उपस्थित होते. भुजबळ यांनी मुंबई नाका ते द्वारका परिसरात पुलाखाली ठाण मांडून बसलेले भिक्षेकरी, सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण, बेकायदेशीर पार्किंग याबद्दल विचारणा केली असता आमचे हे काम नाही, असे उत्तर पालिका अधिकाऱ्यांनी दिले.

# सरकारच्या लेखी आश्वासनानंतर बच्चू कडूंचे आंदोलन स्थगित

■ अमरावती



**प्रहार** संघटनेचे नेते बच्चू कडू हे शेतकरी आणि दिव्यांगच्या विविध मागण्यांसाठी ७ जूनपासून अन्नत्याग आंदोलन करत होते. आज सरकारच्या लेखी आश्वासनानंतर त्यांनी अन्नत्याग आंदोलन स्थगित केले. त्यांनी सरकारला ऑक्टोबरपर्यंत वेळ दिला आहे. तोपर्यंत सरकारने काहीही पावले उचलली नाहीत तर मंत्रालयात येऊन आंदोलन करू, असा इशाराही त्यांनी दिला.

गेल्या सहा दिवसांपासून राज्याचे मंत्री आणि सत्ताधारी पक्षांतील नेते बच्चू कडू यांनी भेट घेऊन आंदोलन मागे घ्यावे, अशी विनंती त्यांना करत होते. काल पालकमंत्री व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भेट घेतली होती. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांची ऑनलाईन बैठक झाली. पण त्यांनी कर्जमाफीची तारीख न सांगितल्याने चर्चा निष्फळ ठरली. तर आज सरकारतर्फे उद्योग मंत्री उदय सामंत हे बच्चू कडू यांच्याकडे लेखी आश्वासन घेऊन गेले. सरकारची भूमिका त्यांना सांगून आंदोलनकर्त्यांसमोर राज्य सरकारचे पत्र वाचून दाखवले.

यावेळी उदय सामंत म्हणाले की, शेतकरी कर्जमाफीसाठी १५ दिवसांत सरकार उच्चस्तरीय समिती नेमली जाणार आहे. ती समिती अहवाल तयार करेल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर कर्ज माफीसंदर्भात निर्णय घेतला जाईल. थकीत कर्जदाराच्या सक्तीच्या वसुलीला स्थगिती देऊन नवीन कर्जवाटप करण्यासाठी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

» पान २ वर

# दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षांचे गोव्याचे वेळापत्रक आताच जाहीर

■ पणजी

**पुढील** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी शालांत मंडळाने दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांचे वेळापत्रक आताच जाहीर केले आहे. हे वेळापत्रक शालांत मंडळाच्या वार्षिक नियोजनाचा भाग असून, त्यात बदल होणे शक्य असल्याचे मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार दहावी बोर्डाची परीक्षा २ मार्च २०२६ ते २७ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे. यात तांत्रिक विषयांचाही समावेश आहे. तर बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ ते २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत चालणार आहे. बारावी व्यावसायिक शाखेची परीक्षा ११ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत चालणार आहे.

सहवास जरी सुटला स्मृती सुगंध देत राहील
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण
तुमची येत राहील ॥



भावपूर्ण श्रद्धांजली

कै. दिलीप जगन्नाथ पडवळ

मृत्यू दिनांक : १२ जून २०२५

दशक्रिया विधी :- शनिवार २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ वा., शिवाजी पार्क स्मशान भूमी या ठिकाणी होईल.

बारावे व तेरावे विधी:- सोमवार दिनांक २३ जून २०२५ रोजी, त्यांच्या राहत्या घरी होईल.

शोकाकूल पडवळ परिवार

पत्ता : ६३/ए , धवल हौसिंग को. ऑप. सोसायटी, रूम नं. ८, गोरवले रोड नॉर्थ, बँक ऑफ इंडिया जवळ, दादर (प), मुंबई -४०००२८.

दहावे पुण्यस्मरण



परमपूज्य वडील
कै. बाबू कृष्णा घाडीगांवकर
यांचे दहावे पुण्यस्मरण

*असा जन्म लाभावा*
*देहाचा चंदन व्हावा!*
*गंध संपला तरी,*
*सुगंध दरवळत राहावा!*

आमचे परमपूज्य वडील कै. बाबू उर्फ गोविंद कृष्णा घाडीगांवकर यांना अनंतात विलीन होऊन दहा वर्षे पूर्ण झाली मात्र त्यांची आठवण आल्यावाचून एकही क्षण जात नाही. त्यांची आठवण सतत आमच्या मनात दरवळत राहुन दहा वर्षे कशी निघून गेली ते समजलेच नाही.

आपले आप्तेष्ट

मुलगा श्री. चंद्रकांत घाडीगांवकर, सून सौ. गायत्री घाडीगांवकर नातवंडे आणि कुंटुंबीय वागदे (मांगरवाडी).